# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १५६) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) बुधवार, दि.१७ जून २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## कल्पना खरातचा अटकपूर्व जामीन फेटाळला; न्यायालयाचे कडक ताशेरे

छत्रपती संभाजीनगर दि.१६ (प्रतिनिधी)- शिर्डी पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या फसवणूक आणि बेकायदेशीर सावकारी प्रकरणातील आरोपी कल्पना अशोक खरातला मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने मोठा दणका दिला आहे. कल्पना खरातने अटकेपासून वाचण्यासाठी न्यायालयात दाखल केलेला अटकपूर्व जामीन अर्ज न्यायालयाने तपासातील गंभीर पुरावे पाहता फेटाळून लावला आहे. या प्रकरणात आता तिची पोलीस कोठडीत चौकशी होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

या खटल्यातील फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार, त्याने आरोपींकडून ३ कोटी रुपये २ टक्के मासिक व्याजाने कर्ज म्हणून घेतले होते. या कर्जाच्या हमीपोटी आरोपींनी फिर्यादीच्या शेतीचे खरेदीखत कल्पना खरातच्या नावाने लिहून घेतले होते. पुढे फिर्यादीने घेतलेले कर्ज आणि त्यावरील व्याजाची संपूर्ण रक्कम प्रामाणिकपणे परत केली. मात्र, पैसे परत मिळूनही आरोपींनी फिर्यादीची जमीन त्याच्या नावे परत करण्यास साफ नकार दिला. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच फिर्यादीने पोलिसात धाव घेतली होती.

अटकेच्या भीतीने कल्पना खरातने औरंगाबाद खंडपीठात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता. न्यायालयात युक्तिवाद करताना कल्पना खरातने दावा केला की, ''या संपूर्ण आर्थिक व्यवहारात माझा कोणताही थेट सहभाग नव्हता. मी केवळ मुख्य आरोपीची पत्नी असल्याने मला या गुन्ह्यात गोवण्यात आले''.

## निवडून आलेल्यांना जात प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदतवाढ

### राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय; वैद्यकीय, पाणीपुरवठा आणि तंत्रज्ञान क्षेत्राशी संबंधित धोरणांना मंजुरी

मुंबई दि.१६ (प्रतिनिधी)- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राखीव जागांवर निवडून आलेल्या उमेदवारांना त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची अंतिम मुदतवाढ देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे. त्याचसोबत नागपूर येथील महत्त्वाकांक्षी वैद्यकीय प्रकल्पापासून ते ग्रामीण भागातील पाणी टंचाई निवारणासाठीच्या नवीन धोरणांपर्यंत अनेक मोठे निर्णय आज घेण्यात आले.

राज्य मंत्रिमंडळाची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत राज्याच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण आणि दूरगामी परिणाम करणाऱ्या विविध विभागांच्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली आहे. आजचे निर्णय हे प्रामुख्याने ग्रामीण पायाभूत सुविधांचा विकास, आरोग्य सुविधेत अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश आणि डिजिटल कनेक्टिव्हिटी वाढवणे यावर केंद्रित आहेत.

वैद्यकीय उपचारांमध्ये अधिक अचूकता आणण्यासाठी नागपूर येथे हाय एनर्जी मेडिकल सायक्लोट्रॉन प्रकल्प उभारणीस मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. मध्य भारतातील हा एकमेव आणि अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प ठरणार आहे. या प्रणालीच्या माध्यमातून विविध गंभीर रोगांचे आणि आजारांचे वेळेत व अचूक निदान करणे शक्य होणार असल्याने, सर्वसामान्य आणि गरजू रुग्णांना याचा मोठा दिलासा मिळणार आहे.

राज्यातील ग्रामीण भागात भेडसावणाऱ्या पिण्याच्या पाण्याच्या टंचाईवर प्रभावी आणि कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी नवीन धोरण जाहीर करण्यात आले आहे. या अंतर्गत ग्रामीण पेयजल योजनांचा शाश्वत विकास करण्यावर भर दिला जाईल. विविध पाणी योजनांचे एकत्रिकरण करून, ग्रामीण जनतेला स्वच्छ, निर्जंतुक आणि दर्जेदार पाणीपुरवठा व्हावा यासाठी दीर्घकालीन नियोजन केले जाणार आहे.

तंत्रज्ञान क्षेत्राला मोठी चालना देत मानवरहित प्रणाली धोरण २०२६ (धोरण-२०२६) जाहीर करण्यात आले आहे. हवाई, सागरी तसेच जमिनीवरील कृषी व इतर क्षेत्रांतील अवघड आणि जोखमीच्या कामांसाठी ड्रोन आणि विविध रोबोट्सची निर्मिती या धोरणांतर्गत केली जाईल. या क्षेत्रात संशोधन, विकास आणि मनुष्यबळ प्रशिक्षणाला विशेष प्रोत्साहन दिले जाणार आहे.

राज्यात अमेंडेड भारत नेट कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबवण्यासाठी सुधारित पद्धतीला मंजुरी देण्यात आली आहे. हा कार्यक्रम गतीने पूर्ण करण्यासाठी ''महानेट डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड'' या नावाने विशेष हेतू वहन यंत्रणास्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

विकसित भारत - जी राम जी (व्ही बी जी राम जी) योजनेची राज्यात प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. केंद्र सरकारच्या विकसित भारत - जी राम जी कायदा, २०२५ शी सुसंगत अशा आवश्यक तरतुदी महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ मध्ये केल्या जाणार असून, यासाठीचा अध्यादेश काढण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राखीव जागांवर निवडून आलेल्या उमेदवारांना दिलासा देणारा निर्णय घेण्यात आला आहे. अशा उमेदवारांना त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची अंतिम मुदतवाढ देण्यात आली आहे. यासाठी मुंबई महापालिका अधिनियम, महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम आणि नगरपरिषदा अधिनियमात आवश्यक सुधारणांना मंजुरी देण्यात आली.

## जूनच्या पंधरवड्यात देशात सरासरीच्या केवळ ३२ टक्केच पाऊस

नवी दिल्ली/मुंबई दि.१६ (वृत्तसंस्था)- यंदा भारतात हवामान बदलाचे तीव्र परिणाम दिसू लागले आहेत. दीर्घकाळ टिकून राहणारी उष्णेतची लाटसदृश्य स्थिती, कमाल तापमानात होणारी वाढ, रात्री जाणवणारा असह्य उकाडा यातच आता यंदाचा पावसाचा हंगाम आव्हानात्मक ठरण्याची चिन्हे आहेत. जूनच्या पंधरवड्यात देशात सरासरी पावसाच्या केवळ ३२ टक्केच पावसाची नोंद झाली असून त्यामुळे चिंता व्यक्त केली जात आहे. त्यातच मान्सूनची वाटचाल संथ गतीने होत असून राज्यासह देशात मान्सून सक्रिय होण्यासाठी काही दिवसांची वाट पाहावी लागणार आहे.

देशात सर्वसाधारणपणे १ ते १५ जून या कालावधीत ६२.१ मिमी पावसाची नोंद होते. यंदा या कालावधीत ४२.४ मिमी पाऊस नोंदला गेला. जो सरासरीहून ३२ टक्के कमी आहे. तर संपूर्ण जून महिन्यात हेच प्रमाण साधारणपणे १५० ते २०० मिमी इतके आहे. देशात केवळ वायव्येकडील प्रदेशात सरासरीहून ८ टक्के अधिक पावसाची नोंद झाली आहे. तर उर्वरित देशातील बहुतांश प्रदेशात सरासरीहून कमीच पाऊस नोंदला गेला आहे.

यंदा केरळ येथे ४ जून रोजी मान्सून दाखल झाला असून त्याने देशाच्या काही भागात वाटचाल केली. मात्र, अजूनही मान्सून पूर्णपणे सक्रिय झाला नसून काही भागात पावसाचे प्रमाण कमीच आहे, असे नुकताकच भारतीय हवामानशास्त्र विभागाने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे. प्रशांत महासागरात 'एल निनो' (पान ४ वर)

### मान्सून कोकणातच अडकला, २० जूननंतर मुंबईत सरकणार

एरवी कायम ७ ते ८ जूनपर्यंत मुंबईत येणारा मान्सूनचा पाऊस यंदा १५ तारीख उलटून गेली तरी मुंबईत दाखल झालेला नाही. त्यामुळे मुंबईकरांना उकाड्यासोबतच पाणी कपातीच्या संकटाचा सामना करावा लागत आहे. मान्सून तळकोकण आणि रत्नागिरीत काही दिवसांपूर्वीच दाखल झाला होता. त्यानंतर तो मुंबईतयेईल, असे वाटत असतानाच मान्सूनच्या वाटचालीला अचानक ब्रेक लागला आहे. मान्सून आता २० जूननंतर पुढे सरकेल, असा अंदाज हवामान खात्याकडून वर्तविण्यात आला आहे. १८ ते २० जूनदरम्यान दक्षिण किनारपट्टीवरुन मान्सून पुन्हा जोर धरेल, असे हवामान खात्याकडून सांगण्यात आले आहे. त्यामुळे मुंबईकरांना पावसासाठी आणखी काही दिवस वाट पहावी लागणार आहे. पाऊस नसल्यामुळे मुंबईच्या वातावरणातील प्रचंड उकाडा अजूनही कायम आहे.

## बचत गटांना मिळणार १ हेक्टर जमीन, सोबत १ लाखांचे अनुदान; महिलांसाठी सरकारची घोषणा!

नागपूर दि.१६ (प्रतिनिधी)- राज्यातील महिला बचत गटांसाठी राज्य सरकारने मोठी आणि महत्त्वाकांक्षी योजना जाहीर केली आहे. महसूल विभागाच्या पडीत जमिनींचा उपयोग करून महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी प्रत्येक पात्र महिला बचत गटाला एक हेक्टर (सुमारे अडीच एकर) जमीन पाच वर्षांच्या लीजवर देण्यात येणार आहे. याशिवाय प्रत्येक गटाला एक लाख रुपयांचे अनुदानही दिले जाणार असल्याची घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासोबतच पडीत सरकारी जमिनींचे संरक्षण आणि उत्पादनक्षम वापर हा या योजनेमागील प्रमुख उद्देश असल्याचे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

या नव्या धोरणानुसार महिला बचत गट किंवा महिला सहकारी संस्थांना महसूल विभागाच्या मालकीची एक हेक्टर जमीन पाच वर्षांसाठी वापरण्यास दिली जाणार आहे. या जमिनीवर चारा लागवड, बांबू लागवड, नेपियर गवताची शेती किंवा ग्रासलँड डेव्हलपमेंटसारखे प्रकल्प राबवता येणार आहेत.

यासाठी प्रत्येक गटाला एक लाख रुपयांचे अनुदान देण्याची तरतूद करण्यात आली आहे. हा निधी जिल्हा नियोजन समिती किंवा जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधीतून उपलब्ध करून दिला जाणार असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

या योजनेतून महिला बचत गटांना मोठे आर्थिक उत्पन्न मिळू शकते, असा दावा सरकारने केला आहे. बावनकुळे यांच्या मते, एका बचत गटाला अडीच एकर जमीन दिल्यानंतर त्यावर चारा किंवा बांबू लागवड केल्यास वर्षाला सुमारे ४ ते ५ लाख रुपयांचे उत्पन्न मिळू शकते. विशेष म्हणजे या उत्पन्नावर सरकारचा कोणताही दावा राहणार नाही. जमिनीवरून मिळणारा संपूर्ण नफा आणि उत्पन्न संबंधित महिला बचत गटालाच मिळणार असल्याने ग्रामीण भागातील महिलांसाठी ही मोठी आर्थिक संधी ठरू शकते.

## उद्धव ठाकरेंचे दोन खासदार दिल्लीत; उपमुख्यमंत्री शिंदेंही तातडीने दिल्लीला रवाना, ऑपरेशन टायगरच्या चर्चेला उधान

नवी दिल्ली दि.१६ (वृत्तसंस्था)- शिवसेना पक्ष फुटीच्या धक्क्यातून सावरलेल्या उद्धव ठाकरे यांना आणखी एक मोठा धक्का बसणार आहे. २०२४ मध्ये निवडून आलेले पक्षाचे ९ पैकी ७ खासदार ठाकरेंची साथ सोडणार आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात तिसऱ्यांदा राजकीय भूकंप होणार आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, नऊपैकी सात खासदार साथ सोडणार असून, यापैकी दोन खासदार दिल्लीतही पोहोचले असल्याचे वृत्त काही वृत्तवाहिन्यांनी रात्री उशिरा दिले आहे. याबरोबरच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंही दिल्लीकडे रवाना झाल्याचे वृत्त आल्याने ऑपरेशन टायगर होणार असल्याच्या चर्चेला उधान आले आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे सात खासदार पक्षातून बाहेर पडल्यानंतर वेगळा गट तयार करणार आहेत आणि हा गट नंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत हा गट सामील होणार होणार आहे. जे खासदार बंडखोरी करून बाहेर पडणार आहेत, त्यात अरविंद सावंत, संजय जाधव, संजय पाटील, नागेश बापूराव आष्टीकर, ओमप्रकाश राजे निंबाळकर, भाऊसाहेब वाकचौरे आणि संजय देशमुख यांचा समावेश असल्याचे समजते. दरम्यान, पक्षात होत असलेली ही मोठी फूट रोखण्यासाठी खासदार अनिल देसाई आणि खासदार संजय राऊत हे दिल्लीत आहेत.

## अडीच लाखांच्या कर्जातील ५० हजार भरले तर २ लाख माफ, कृषिमंत्री दत्तात्रय भरणेंचे विधान

मुंबई दि.१६ (प्रतिनिधी)- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारकडून ३० जूनपूर्वी राज्यात शेतकरी कर्जमाफीची घोषणा केली जाणार आहे. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीदरम्यान भाजपने दिलेल्या या आश्वासनाची शेतकरी गेल्या अनेक दिवसांपासून प्रतीक्षा करत आहेत. कर्जमाफीचे नेमके स्वरूप आणि निकष ठरवण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी एका विशेष अभ्यास समितीची स्थापना केली असून, या समितीचा अहवाल प्राप्त होताच राज्य सरकारकडून अधिकृतपणे कर्जमाफी जाहीर केली जाईल, अशी माहिती



स्वतः देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केली आहे. दरम्यान, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सूचक विधान केले आहे.

दत्तात्रय भरणे म्हणाले, दोण लाखांपेक्षा जास्त थकबाकी आहे, एखाद्या शेतकऱ्यांचे अडीच लाख कर्ज असेल तर या शेतकऱ्याने वरचे ५० हजार रुपये भरले तर २ लाखांचे कर्ज यावर्षीच्या कर्जमाफीची घोषणा केल्यानंतर माफ होईल, असे भरणे यांनी म्हटले आहे.

पुढे बोलताना दत्तात्रय भरणे म्हणाले, २०१९ च्या कर्जमाफीत जर एखाद्याचे कर्ज २ लाखांपेक्षा १० हजार, २० हजार जास्त असेल तर त्याला कर्जमाफीत भाग घेता येत नव्हता. त्यांना कर्जमाफीचा लाभ मिळाला नाही. ते आजही २०१९ मुळे वंचित राहत आहेत, त्या शेतकऱ्यांसाठी काय करता येईल याबाबत निर्णय जाहीर होतील. आचारसंहिता असल्यामुळे मला जास्त बोलता येणार नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याबाबत निश्चितपणे निर्णय घेतील, असे भरणे यांनी स्पष्ट केले आहे.

## पंतप्रधान मोदी आणि ट्रम्प यांच्यात फ्रान्समध्ये हस्तांदोलन

### तीन भारतीय खलाशांचा मृत्यू आणि टॅरिफ वादानंतर पहिल्यांदाच समोरासमोर

एव्हियन दि.१६ (वृत्तसंस्था)- पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प १६ महिन्यांनी समोरासमोर आल्याची घटना फ्रान्स येथे घडली आहे. फ्रान्समध्ये सुरू असलेल्या जी७ शिखर परिषदेसाठी उभय नेते उपस्थित आहेत. यावेळी शिखर परिषदेच्या कामकाजापूर्वी पंतप्रधान मोदी आणि ट्रम्प यांनी स्मितहास्य करत एकमेकांना अभिवादन केले. ट्रम्प यांनी पंतप्रधान मोदी यांच्याशी हस्तांदोलन केले, तसेच त्यांच्या हातावर थाप मारत संवाद साधत असल्याचा व्हिडीओ समोर आला आहे.

जी-७ शिखर परिषद १६ आणि १७ जून रोजी फ्रान्समधील एव्हियन येथे होत आहे. फेब्रुवारी २०२५ मधील वॉशिंग्टन भेटीनंतर पंतप्रधान मोदी आणि ट्रम्प यांची ही पहिलीच भेट आहे. गेल्या काही दिवसांत भारत आणि अमेरिकेतील संबंधांमध्ये काही अंशी तणाव निर्माण झाल्यामुळे या भेटीकडे आता जगाचे लक्ष लागले आहे.

फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी आयोजित केलेल्या शिखर परिषदेसाठी जागतिक नेते एकत्र आले असताना ट्रम्प आणि पंतप्रधान मोदी यांच्यात काही वेळ संवाद झाला. एएनआयने या संवादाचा एक व्हिडीओ समोर आणला आहे. ज्यात बैठकीपूर्वी पंतप्रधान मोदी ट्रम्प यांच्या आसनाजवळ जाऊन त्यांच्याशी बोलताना दिसत आहेत.

## काँग्रेस अपयशी ठरली म्हणूनच जनतेकडून भाजपाला संधी

### अभिजीत दीपकेंची बेरोजगारीवरून काँग्रेसवर टीका

नागपूर दि.१६ (प्रतिनिधी)- भारताचे विद्यमान मुख्य न्यायमूर्ती सुर्य कांत यांनी देशातील तरुणांना झुरळांची उपमा दिली होती. आणि अभिजीत दीपके यांनी कॉक्रोच पार्टीची स्थापना केली. हे नाव सध्या सोशल मीडियावर खूपच चर्चेत आहे. लोक त्यावर रील्स बनवत आहेत, जोक्स करत आहेत, मीम्स शेअर करत आहेत, तर काही जण टीकाही करत आहेत. कॉक्रोच पार्टीची स्थापना झाल्यापासून अभिजीत दिपके आपल्या भाषणांमधून केंद्रातील भाजप सरकार आणि शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना लक्ष करीत आहेत. भाजपच्या विविध धोरणावर टीका करताना मात्र नागपूरमध्ये झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी काँग्रेसवरही सडकून टीका केली.

जयपूरमध्ये झालेला हल्ला हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे समर्थन करणाऱ्या तरुणांनी केला होता, असा आरोप कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दीपके यांनी केला. ज्या तरुणांना पोलिसांना पकडले त्यांच्या समाज माध्यमांवरील खात्यात ते संघाचे स्वयंसेवक असल्याचे स्पष्ट असल्याचेही दीपके म्हणाले. नागपूरमध्ये कॉक्रोच पार्टीच्या आंदोलनासाठी आले असता पत्रकार परिषदेत ते बोलत होते. माझ्यावर झालेला हल्ला हा वाढत्या बेरोजगारीचे कारण आहे. त्यांना थोडे पैसे देऊन त्यांच्याकडून असे कामे करून घेतले जाते. त्यांना नोकरी असती तर त्यांनी कधीही असा प्रकार केला नसता. बेरोजगारीसाठी काँग्रेसही जबाबदार आहे. पण आज सत्ता भाजपची असल्याने आम्ही त्यांनाच प्रश्न विचारणार. काँग्रेसने चुका केल्या म्हणूनच भाजपला लोकांनी सत्तेत बसवले. परंतु, त्यांच्याकडूनही निराशाच झाली, असेही दीपके म्हणाले.

कॉकरोच पार्टीच्या आंदोलनाला नेपाळ आणि श्रीलंकेमध्ये झालेल्या आंदोलनाशी जोडण्याचा प्रयत्न करणार आहे विरोधकांना अभिजीत दिपके यांनी उत्तर दिलं. आंदोलन करणे हा प्रत्येकाचा अधिकार आहे भारताला १९४७ मध्ये जेव्हा स्वातंत्र्य मिळाले त्यासाठी मोठे आंदोलन उभे झाले होते आणि लोकशाहीचे सरकार स्थापन झाले. लोकशाही व्यवस्था टिकवायची असेल तर आंदोलन होणे आवश्यक आहे असेही दीपके म्हणाले. आम्ही आंदोलन करतो याचा संबंध नेपाळ किंवा श्रीलंका येथील आंदोलनाशी जोडण्याचे काहीही कारण नाही. भाजपचीच लोक केवळ राष्ट्रप्रेमी आणि इतर सर्व राष्ट्रद्रोही कशी होऊ शकतात असा प्रश्नही केला.

## पवनराजे निंबाळकर खटल्यात तारीख पुन्हा पुढे ढकलली, २० जूनला निकाल

धाराशिव दि.१६ (प्रतिनिधी)- जिल्ह्यातील राजकीय वादाचे रुपांतर हत्याप्रकरणात होऊन घडलेल्या घटनेला २० वर्षे उलटून गेली असून फिर्यादी न्यायाच्या प्रतिक्षेत आहेत. ३ जून २००६ रोजी मुंबईवरून उस्मानाबादला जात असताना नवी मुंबईच्या कळंबोलीत राजकीय वादातून पवनराजे निंबाळकर यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. याप्रकरणी सुरू असलेला न्यायालयीन खटला अंतिम टप्प्यात असून आज १६ जून रोजी निकालाची तारीख देण्यात आली होती. मात्र, आणखी काही कमतरता दूर करण्यासाठी आता २० जून ही नवी तारीख देण्यात आली आहे. आज निकालाची तारीख असल्याने दिवंगत पवनराजे निंबाळकर यांचे चिरंजीव ओमराजे निंबाळकर हेही आज न्यायालयात उपस्थित होते. कोर्टाने पुढील तारीख दिल्यानंतर त्यांनी माध्यमांशी बोलताना प्रतिक्रिया दिली.

आमच्या दोन्ही कुटुंबानी २० वर्षे १३ दिवस संघर्ष केला आहे, त्यामुळे आम्हाला न्याय मिळेल एवढीच अपेक्षा आहे. सामान्य माणसाला न्याय मिळवण्यासाठी प्रचंड संघर्ष करावा लागतो, अशी प्रतिक्रिया ओमराजे निंबाळकर यांनी दिली. माझी क्षमता होती म्हणून हायकोर्टात रिट दाखल करु शकलो, नंतर सीबीआयचा तपास झाला आणि आरोपी समोर आले. आरोपी समोर आल्यानंतर २० वर्षे (पान ४ वर)

## आश्वासन नको, विनाअट सरसकट कर्जमुक्ती हवी

### कर्जमाफीवरून रविकांत तुपकर आक्रमक

बुलढाणा दि.१६ (प्रतिनिधी)- महाराष्ट्रातील शेतकरी कर्जमाफीच्या मुद्द्यावरून पुन्हा एकदा शेतकरी नेते राज्य सरकारविरोधात आक्रमक होताना दिसत आहेत. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवणारे शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी बुलडाणा येथे सुरू केलेल्या बेमुदत अन्नत्याग आंदोलनाचा आज दुसरा दिवस आहे. राज्य सरकारने जाहीर केलेली कर्जमाफी ही शेतकऱ्यांच्या हिताची नसून केवळ दिखाऊ आणि दिशाभूल करणारी असल्याचा गंभीर आरोप करत तुपकर यांनी सरकारविरोधात संघर्षाची भूमिका घेतली आहे.

आपल्या निवासस्थानी सुरू असलेल्या या आंदोलनातून तुपकर सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करत असून, शेतकऱ्यांना दिलासा मिळेपर्यंत आणि विनाअट सरसकट कर्जमाफी जाहीर होईपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

राज्य सरकारने जाहीर केलेल्या कर्जमाफीच्या निर्णयावर टीका करताना रविकांत तुपकर म्हणतात की, सध्याच्या योजनेत अनेक जाचक अटी आहेत. त्यामुळे लाखो शेतकरी या योजनेच्या लाभापासून वंचित राहणार आहेत. सरकारने कर्जमाफीची घोषणा केली असली तरी प्रत्यक्षात अनेक आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना त्याचा फायदा होत नाही, असा त्यांचा आरोप आहे. ''आता शेतकऱ्यांना केवळ घोषणा आणि आश्वासन नकोत. विनाअट, विना शर्थ आणि सरसकट कर्जमुक्ती हवी,'' अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली आहे.

तुपकर यांनी त्यांच्या आंदोलनाला विविध भागांतून पाठिंबा मिळू लागल्याचा दावा केला आहे. शेतकरी नेते अजित नवले यांनीही या आंदोलनाला समर्थन जाहीर केले आहे. त्यामुळे हा संघर्ष केवळ (पान ४ वर)

## तामिळनाडूतील शेतकऱ्यांचे ७५,००० रुपयांपर्यंतचे पीक कर्ज माफ; मुख्यमंत्री विजय यांचा निर्णय

चेन्नई दि.१६ (वृत्तसंस्था)- तमिळनाडूचे नवनियुक्त मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांनी राज्यातील शेतकऱ्यांसाठी एक अत्यंत मोठा आणि दिलासादायक निर्णय घेतला आहे. सहकारी बँकांकडून १ मे २०२५ ते २८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत घेतलेले ७५,००० रुपयांपर्यंतचे पीक कर्ज पूर्णपणे माफ करण्याची घोषणा मुख्यमंत्री विजय यांनी मंगळवारी केली. सरकारच्या या निर्णयामुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळणार आहे.

तमिळनाडू सरकारने जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, या कर्जमाफी योजनेचा थेट फायदा राज्यातील सुमारे १४.४३ लाख शेतकऱ्यांना होणार आहे. या मेगा कर्जमाफीमुळे राज्य सरकारच्या तिजोरीवर ५,९३२ कोटी रुपयांचा अतिरिक्त भार पडणार आहे. तरीही शेतकऱ्यांची बिकट परिस्थिती लक्षात घेऊन मुख्यमंत्र्यांनी हा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

मुख्यमंत्र्यांनी चेन्नई येथील सचिवालयात मंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत एक महत्त्वाची आढावा बैठक घेतली. या बैठकीनंतर त्यांनी ही घोषणा केली. ज्या शेतकऱ्यांचे सहकारी बँकेतील पीक कर्ज ७५,००० रुपयांपेक्षा जास्त आहे, त्यांना देखील सरकारने दिलासा दिला असून (पान ४ वर)

## अमेरिकेबरोबर कराराच्या वाटाघाटीसाठी इराणने घेतली मानसशास्त्रज्ञांची मदत

तेहरान दि.१६ (प्रतिनिधी)- अमेरिका आणि इराण यांच्यात युद्धबंदीचा करार झाला असून, यावर औपचारिक स्वाक्षरी शुक्रवारी होणार आहे. युद्धबंदीच्या करारातील अटींची सविस्तर माहिती अद्याप समोर आलेली नाही. पण, यामध्ये होर्मुझ सामुद्रधुनी पुन्हा खुली करण्यासह युद्धविरामाचा कालावधी वाढवण्याचा समावेश आहे. उभय देशातील कराराबाबत आता महत्वाची माहिती समोर आली असून, इराणने डोनाल्ड ट्रम्प यांच्याबरोबर वाटाघाटी करण्यासाठी मानसोपचार तज्ज्ञांची मदत घेतल्याचे वृत्त समोर आले आहे. ट्रम्प यांच्या मानसिक स्थितीचे मूल्यांकन करण्यासाठी वाटाघाटीदरम्यान, इराणने दोन वरिष्ठ मानसशास्त्रज्ञांची मदत घेतल्याचे 'ड्रॉप साईट'च्या वृत्तात म्हटले आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या लहरी स्वभावाचा अंदाज असल्याने इराणने त्यांच्या मानसिक स्थितीचे मूल्यांकन करण्यासाठी मानसोपचार तज्ज्ञांची मदत घेतली, असे ड्रॉप साईटच्या वृत्तात म्हटलंय. ''अमेरिकेबरोबर वाटाघाटी करण्यासाठी आमच्या शिष्टमंडळात दोन वरिष्ठ मानसशास्त्रज्ञांचा समावेश होता. डोनाल्ड ट्रम्प यांचा लहरी आणि तापट स्वभाव लक्षात घेता त्यांना योग्य संदेश पोहोचविण्यात यावा याची काळजी घेण्यात आली होती'', अशी माहिती इराणच्या एका अधिकाऱ्याने 'ड्रॉप साईट'ला दिली. पाकिस्तानमध्ये शांतता कराराची पहिली बैठक झाली तेव्हापासूनच मानसशास्त्रज्ञ इराणी शिष्टमंडळाला मार्गदर्शन करत असल्याचेही या अधिकाऱ्याने म्हटले आहे. अमेरिका आणि इराण यांच्यात युद्धविराम झाल्यानंतर शांतता चर्चेची पहिली फेरी पाकिस्तानमध्ये पार पडली. या बैठकीत ठोस असा काही तोडगा निघाला नाही आणि यानंतर पुन्हा दुसरी बैठकच झाली नाही. पण, ''अमेरिकेबरोबर झालेल्या पहिल्या बैठकीपासूनच इराण अमेरिका आणि ट्रम्प यांच्याशी वाटाघाटी करण्यासाठी मानसशास्त्रज्ञांची मदत घेत होते'', असा खुलासा इराणी अधिकाऱ्यांनी ड्रॉप साईटशी बोलताना केला. ''मानसशास्त्रज्ञांची मदत घेऊन केलेली वाटाघाटी आणि संवादामुळे सकारात्मक फरक पडला'', असेही अधिकाऱ्यांनी पुढे म्हटले आहे.

# तत्त्वज्ञान

**मानवाला** स्वतःबद्दल, जगाबद्दल आणि जीवनाच्या अंतिम अर्थाबद्दल प्रश्न पडू लागले, तेव्हाच तत्त्वज्ञानाचा जन्म झाला. मी कोण आहे? सत्य म्हणजे काय?, जीवनाला काही अंतिम उद्देश आहे का?, नैतिकतेचे अधिष्ठान कोणते? अशा प्रश्नांची उकल करण्याचा प्रयत्न म्हणजे तत्त्वज्ञान. त्यामुळे तत्त्वज्ञान हे केवळ एक शैक्षणिक विषय नसून मानवी चेतनेचा आणि विचारस्वातंत्र्याचा मूलभूत आविष्कार आहे. विज्ञान, धर्म, राजकारण, कला आणि संस्कृती या सर्व क्षेत्रांच्या पायाशी काही ना काही तत्त्वज्ञान दडलेले असते. तत्त्वज्ञान हा शब्द ग्रीक भाषेतील फिलोसॉफिया या शब्दापासून तयार झाला आहे. फिलो म्हणजे प्रेम आणि सोफिया म्हणजे ज्ञान. त्यामुळे तत्त्वज्ञान म्हणजे ज्ञानाचे प्रेम किंवा शहाणपणाचा शोध होय. परंतु हे ज्ञान केवळ माहितीपुरते मर्यादित नसते; ते अस्तित्व, अनुभव आणि मूल्य यांच्या सखोल आकलनाशी संबंधित असते. तत्त्वज्ञानाचे वैशिष्ट्य असे की ते कोणतीही गोष्ट गृहीत धरत नाही. ते प्रत्येक संकल्पनेची चिकित्सा करते आणि विचारांना सतत प्रश्न विचारत राहते. तत्त्वज्ञानाची सुरुवात आश्चर्यापासून होते, असे प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञांनी म्हटले आहे. विश्वातील व्यवस्था, जन्म-मृत्यूचे गूढ, निसर्गातील परिवर्तन आणि मानवी वर्तन यांमागील कारणे शोधण्याच्या प्रयत्नातून तत्त्वज्ञान विकसित झाले. प्राचीन भारतात उपनिषदांनी आत्मा, ब्रह्म आणि चेतना यांवर चिंतन केले; बुद्धांनी दुःख आणि मुक्तीचा मार्ग शोधला; तर ग्रीसमध्ये सॉक्रेटीस, प्लेटो आणि ॲरिस्टॉटल यांनी नैतिकता, राज्यव्यवस्था आणि ज्ञानमीमांसा यांचा पाया घातला. या सर्व विचारप्रवाहांमध्ये एक समान धागा दिसतो सत्याचा शोध. तत्त्वज्ञानाचे अनेक प्रमुख विभाग आहेत. त्यांपैकी अस्तित्वमीमांसा हा विभाग विश्व आणि अस्तित्वाच्या स्वरूपाचा अभ्यास करतो. वास्तव म्हणजे नेमके काय? पदार्थ आणि चेतना यांपैकी मूलभूत कोणते? मन आणि शरीर यांचे संबंध कसे आहेत? अशा प्रश्नांची चर्चा येथे होते. ज्ञानमीमांसा हा विभाग ज्ञानाची उत्पत्ती, मर्यादा आणि विश्वसनीयता यांचा विचार करतो. आपण जे जाणतो ते खरे आहे हे कसे ठरवायचे? इंद्रिये आणि बुद्धी यांपैकी अधिक विश्वसनीय कोणते? आधुनिक विज्ञानाच्या पायाशी असलेली चिकित्सक वृत्ती ज्ञानमीमांसात्मक विचारांतूनच विकसित झाली. नीतिशास्त्र हा तत्त्वज्ञानाचा आणखी एक महत्त्वाचा विभाग आहे. चांगले आणि वाईट यांचे निकष काय असावेत, हा त्याचा केंद्रबिंदू आहे. एखादी कृती नैतिक ठरते ती परिणामांमुळे की हेतूमुळे? व्यक्तिस्वातंत्र्य आणि सामाजिक जबाबदारी यांमध्ये संतुलन कसे साधावे? अशा प्रश्नांचा विचार नीतिशास्त्र करते. आधुनिक समाजातील मानवी हक्क, न्याय, पर्यावरण संरक्षण आणि जैवतंत्रज्ञानासंबंधीचे अनेक वाद तत्त्वज्ञानाशी निगडित आहेत. त्यामुळे तत्त्वज्ञान हे केवळ सैद्धांतिक चिंतन नसून सामाजिक जीवनालाही दिशा देणारे आहे. विज्ञान आणि तत्त्वज्ञान यांचे संबंध विशेष लक्षवेधी आहेत. प्राचीन काळात विज्ञान हे तत्त्वज्ञानाचाच एक भाग मानले जात होते. नंतर विज्ञानाने प्रयोग आणि निरीक्षण यांच्या आधारावर स्वतंत्र वाटचाल सुरू केली. तथापि विज्ञान आणि तत्त्वज्ञान पूर्णपणे वेगळे नाहीत. विज्ञान विश्वाच्या कार्यपद्धतीचे स्पष्टीकरण देते; तत्त्वज्ञान त्या ज्ञानाच्या मर्यादा आणि परिणामांचा विचार करते. उदाहरणार्थ, कृत्रिम बुद्धिमत्ता, जनुक संपादन किंवा अणुशक्ती यांसारख्या क्षेत्रांत काय शक्य आहे? हा वैज्ञानिक प्रश्न असतो, तर काय योग्य आहे? हा तत्त्वज्ञानाचा प्रश्न असतो. आधुनिक युगात तत्त्वज्ञानासमोर अनेक नवे प्रश्न उभे राहिले आहेत. औद्योगिकीकरण, भांडवलशाही, तंत्रज्ञान आणि जागतिकीकरणामुळे मानवी जीवनात प्रचंड बदल झाले. अस्तित्ववाद या विचार प्रवाहाने आधुनिक माणसाच्या एकाकीपणावर आणि अर्थहीनतेच्या भावनेवर भाष्य केले. जाँ-पॉल सार्त्र आणि आल्बेर काम्यू यांसारख्या विचारवंतांनी मनुष्य स्वतःच्या निवडींमधून स्वतःचे अस्तित्व घडवतो, असे प्रतिपादन केले. दुसरीकडे, उत्तर-आधुनिक तत्त्वज्ञानाने अंतिम सत्य या संकल्पनेलाच आव्हान दिले. त्यांच्या मते प्रत्येक सत्य हे सांस्कृतिक, राजकीय किंवा भाषिक संदर्भांनी प्रभावित असते. भारतीय तत्त्वज्ञानाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याची अनुभव प्रधानता. येथे तत्त्वज्ञान हे केवळ बौद्धिक व्यायाम नाही; ते जीवनपद्धतीशी जोडलेले आहे. वेदांत, बौद्ध, जैन आणि सांख्य यांसारख्या परंपरांनी आत्मसंयम, ध्यान आणि अंतर्मुखता यांवर भर दिला. स्वतःला जाण ही संकल्पना भारतीय तत्त्वज्ञानाच्या केंद्रस्थानी आहे. पाश्चात्त्य तत्त्वज्ञान जिथे बाह्य विश्वाच्या विश्लेषणाकडे झुकते, तिथे भारतीय तत्त्वज्ञान अंतःकरणाच्या परिवर्तनावर अधिक भर देते.आजच्या वेगवान आणि तंत्रज्ञानप्रधान जगात तत्त्वज्ञान अधिक महत्त्वाचे झाले आहे. माहितीचा स्फोट झाला असला, तरी विवेकपूर्ण विचार करण्याची क्षमता कमी होत चालल्याची चिंता व्यक्त केली जाते. सोशल मीडिया, राजकीय प्रचार आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांच्या प्रभावाखाली सत्य आणि असत्य यांतील सीमारेषा धूसर होत आहेत. अशा परिस्थितीत तत्त्वज्ञान चिकित्सक विचार, संवादाची संस्कृती आणि नैतिक जबाबदारी यांची जाणीव करून देते.शेवटी असे म्हणता येईल की, तत्त्वज्ञान हे निश्चित उत्तरांचे शास्त्र नाही; ते प्रश्न विचारण्याची कला आहे. ते माणसाला विचारांच्या बंदिस्त चौकटींपासून मुक्त करते आणि स्वतःच्या अस्तित्वाकडे नव्या दृष्टीने पाहण्यास शिकवते. विज्ञान मानवाला शक्ती देते, तर तत्त्वज्ञान त्या शक्तीचा उपयोग कोणत्या दिशेने करायचा हे विचारते. म्हणूनच तत्त्वज्ञानाचा खरा उद्देशकेवळ ज्ञान मिळवणे नसून अधिक सजग, विवेकी आणि मानवी जीवन घडवणे हा आहे.

## अखेर १०० टक्के इथेनॉल इंधनाला केंद्राची मंजुरी- नितीन गडकरी

नागपूर, दि. १५ (प्रतिनिधी)- पेट्रोल-डिझेलच्या दरवाढीने संपूर्ण देश चिंतेत असतानाच रविवारी केंद्र सरकारने १०० टक्के इथेनॉल इंधन वापरण्यास मंजुरी दिली. केंद्रीय रस्ते परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी हा निर्णय जाहीर केला. १०० टक्के इथेनॉल इंधनाच्या कायदेशीर वापरासंबंधी फाईल्सवर स्वाक्षरी केली असून देशात दीड महिन्यातच नव्या कार येतील, असे ते म्हणाले.

आखाती देशातील युद्धाच्या परिस्थितीमुळे हिंदुस्थानात इंधनटंचाईचे संकट उभे ठाकले. परिणामी, लागोपाठ इंधन दरवाढीचे चटके देशातील जनतेला सहन करावे लागते आहेत. याचदरम्यान सरकारने पर्यायी इंधनाच्या उपलब्धतेसाठी मोठे पाऊल टाकले आहे. देशात १०० टक्के शुद्ध इथेनॉलचा इंधन म्हणून वापर करण्यास मंजुरी दिली आहे. या निर्णयाशी संबंधित नियम आणि नियमावलीला अंतिम रूप देणारया फाईलवर स्वाक्षरी केली आहे. देशाचे कच्च्या तेलाच्या आयातीवरील अवलंबित्व कमी करणे तसेच वाहतूक क्षेत्रातून होणारे प्रदूषण रोखणे हा यामागील मुख्य हेतू आहे, असे केंद्रीय मंत्री गडकरी यांनी नागपूर येथील पत्रकार परिषदेत जाहीर केले

'ई-१००' धोरणाच्या मंजुरीची घोषणा करतानाच केंद्रीय मंत्री गडकरी यांनी नव्या कारबाबत माहिती दिली. देशातील ऑटोमोबाईल क्षेत्राने १०० टक्के इथेनॉल इंधनाचा

पान ३ वर...

# आता तरी मुख्यमंत्री व राज्यातील खासदारांनी स्मार्ट मिटर बाबत व्यक्त व्हावे -राजेंद्र दाते पाटील








मुंबई, दि. १६ (प्रतिनिधी) - खुप पूर्वीच टी ओ डी तथा स्मार्ट मीटर राज्य भरात रद्द करून न्याय द्यावा अशी जोरदार जनहिताची मागणी जन आंदोलन विकास कृती समिती महाराष्ट्राचे अध्यक्ष आणि पीपल्स फोरम फॉर सोशल कॉजचे सचिव शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी मुख्यमंत्र्या कडे केली असता या मागणीची गांभीर्याने दखल घेत हा प्रस्ताव उर्जा विभागाच्या प्रधान सचिव आभा शुक्ला यांचे कडे पुढील कारवाई साठी पाठवला होता,आता तरी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्यातील सर्वच खासदारांनी स्मार्ट मिटर बाबत व्यक्त व्हावे अशीही मागणी त्यांनी केली आहे.

त्या वेळी मुख्यमंत्र्यांनी दखल घेऊन स्मार्ट मिटर कुठेही बसवणार नाही हा मुख्यमंत्र्यांचा निवाळी असतांना आणि ही बाब भर सभागृहात स्पष्ट झालेली आहे परंतु वरिष्ठ अधिकारी सर्व सामान्य ग्राहकांची दिशाभुल करत आहेत ! असे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी म्हंटले आहे.

आपल्या सविस्तर निवेदनात त्यांनी नमुद केले होते की, टी.ओ.डी तथा स्मार्ट मीटर राज्यभरात रद्द करून न्याय द्यावा अशी मागणी मुख्यमंत्र्या कडे केली असता या मागणीची गांभीर्याने दखल घेत हा प्रस्ताव उर्जा विभागाच्या प्रधान सचिव आभा शुक्ला यांच्याकडे पुढील कारवाई साठी पाठवला होता.

**मुख्यमंत्र्यांनी घेतली दखल !**

स्मार्ट मीटर कुठेही बसवणार नसल्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा निवाळी असुन तशी कबुलीच एका सादरी करणात स्पष्ट होत असताना ही काही अधिकारी अधिकची दिशाभुल करण्याचे काम करीत असुन नव्याने ही बाब मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कडे मांडावी लागेल असेही जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील म्हणाले. सध्या जनहीत याचीका मधुन हे प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे. न्यायालयामधील या जनहित याचिकेत केंद्र शासनाच्या स्मार्ट ग्रिट मिशन मार्गदर्शक तत्वे १८ जानेवारी २०२५, तसेच सी इ ए म्हणजेच मीटरची स्थापना आणि संचलन सुधारणा नियम २०१९,व एमईआरसी पुरवठा नियम २०२१ या विषयावर चर्चा करण्या साठी सन्माननीय उच्च न्यायालय उत्तर अपेक्षित करीत आहेत.

**मुख्यमंत्री यांचे कडे महत्वपूर्ण मागणी**

याच प्रमाणे त्यांनी महत्त्वपूर्ण मागणी मुख्यमंत्री यांचे कडे केली होती त्यात सुध्दा त्यांनी नमुद केले होते की,५०० युनिट पर्यंत वीजबील माफ करावे आणि याची योग्य ती दखल घेऊन हा प्रस्ताव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माफी साठी प्रस्ताव उर्जा विभागाकडे पाठवला होता.

**जनहितार्थ अत्यंत अभ्यासु निवेदन**

खास बाब म्हणजे आपल्या अत्यंत अभ्यासु निवेदनात शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी नमुद केलेले आहे की, अगदी सुरुवाती पासुनच स्मार्ट मीटर, टीओडी मीटर बसवण्या च्या प्रक्रियासाठी देश भरासह संपुर्ण महाराष्ट्र विरोध करीत असुन कमी वीज वापर णाऱ्या घरगुती ग्राहकांना पहिल्या वर्षी १० टक्के सवलत, स्मार्ट मीटर वापरणाऱ्यांना दिवसा वीज वापरावर अतिरिक्त १० टक्के टीओडी लावण्याचे धोरण नागरिकांना वेठीस धरणारे ठरणारअसल्याचे त्यांनी नमुद करून हा प्रश्न उपस्थित केला की, जर का हरित ऊर्जा खरेदी तून आगामी ५ वर्षांत वीज खरेदीचे ६६ हजार कोटी रुपये वाचणार असतील तर वीजदरात ५०० युनिट पर्यंत सामाईक असा (युनिफॉर्म) उपाययोजना का केल्या जात नाही ? असा परखड सवाल उपस्थित करून १०० पासुन ३०० युनिट पर्यंत फक्त सहा पैशांची सवलत? याला कशाचे द्योतक म्हणावे ?असा जळ जळीत सवाल देखील जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी उपस्थित केला होता.

राज्यात पहिल्यांदाच घरगुती, औद्योगिक, व्यावसायिक वीजदर पहिल्या वर्षी १० टक्के आणि पाच वर्षांत २६ टक्के कमी होणार आहे. महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने (एमईआरसी) महा वितरणच्या याचिकेवर दिलेल्या आदेशा मुळे सध्या असलेले १०१ ते ३०० -१३.२३ रुपये २०२५-२०२६ मध्ये १३.१७ होतील तर सध्याचे ३०१ ते ५०० युनिट १७.७८ एवढी असून ती २०२५-२०२६वर्षात १७.५६ एवढी होणार तर ५०० युनिट च्या पुढील सध्या १९.२३ रुपये तर वर्ष २०२५-२०२६ या वर्षात १९.१५ म्हणजे फक्त आठ पैशांचा फरक असणार आहे आणि हीच बाब शासनाची काय दृष्टी आहे हे अभिप्रेत करणारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते. पुढे डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी नमुद केले होते की, राज्यातील महावितरण कंपनीने वीजदर कमी करण्यासाठी याचिका केली असता त्यावर एम.ई. आर.सीने जो आदेश दिला आहे तो मुळात व्यापक हिताचा ठरतच नसुन या आदेशाचा लाभ घरगुती वापर करणाऱ्या १०० युनिटच लक्षात घेत औद्योगिक आणि व्यावसायिक ग्राहकांना हा लाभ होताना भरीव फायदा थेट दिसतच नाही. पुढे त्यांनी निवेदनात स्पष्ट केले होते की,तत्कालीन महा वितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेशचंद्र यांनी सांगितल्या प्रमाणे स्मार्ट मीटर असलेल्या घरगुती ग्राहकांना दिवसा वीज वापरासाठी दहा टक्केअतिरिक्त टीओडी सवलत व सौरऊर्जा निर्मिती करणाऱ्या घरगुती ग्राहकांना प्रोत्साहन ही या आदेशाची वैशिष्ट्ये सिद्धच होत नाहीत.आगामी पाच वर्षांत जर का महावितरणचे वीज खरेदी चे ६६ हजार कोटी रुपये वाचणार असतील तर त्याचा फायदा सर्वच ग्राहकांना भरीव स्तरावर का नाही ? हा महत्वाचा सवाल जेष्ठअभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी उपस्थित केला होता व नमुद केले होते की, सन २०३० पर्यंत राज्याची विजेची क्षमता ८१ हजार मेगावॅट होण्यासाठी ४५ हजार मेगा वॅटचे वीज खरेदीचे करार केले. त्यापैकी २ हजार मेगावॅट वीज रिन्युएबल अर्थात नवीकरणीय ऊर्जा स्रोतांमधून मिळणार आहे असे असेल आणि ती अत्यंत किफायतशीर दरात मिळणारअसल्यास पाच वर्षांत ६६ हजार कोटी रुपये वाचण्याच्या दाव्याचा फायदा सर्व सामान्य विद्युत ग्राहकांना का नाही ? असे ही त्यांनी नमुद करून महावितरण मुंबईतील काही भागात तर अदानी व टोरेंटो या खासगी वीज कंपन्यांनी एकमेकांच्या परवाना क्षेत्रात वितरण परवाना मिळिवण्या साठी आयोगा पुढे याचिका सादरकेल्या आहेत त्या काही जनहिता साठी अजिबात नाही असे नमुद करून पुढे जेष्ठ अभ्यासक डॉ.राजेंद्र दाते पाटील यांनी अत्यंत मुद्देसुद निवेदन केले असुन आयोगाने २९ मार्च रोजी एक एप्रिल पासूनचे नवीन वीजदर जाहीर केले होते. महावितरणने ४८ हजार कोटी रुपयांची तूट येणार असल्याने वित्तीय ताळे बंदा तून आयोगापुढे मांडण्यात आले होते व त्यानुसार महसूल वाढ देण्याची मागणी महा वितरणने केली होती हे कशा च्या बळावर मांडले होते ? हा देखील अनुत्तरित सवाल आहे. एकंदरीत या निकालाचा अधिकचा व्यापक विचार करून सामान्य गोरगरीब आणि शेतकरी यांच्या उत्पन्नाचा अधिक बारकाईने विचार करून पुनर्विचार करावा आणि स्मार्ट (टी ओ डी )मीटर लावण्याची प्रकिया रद्द करून ५०० युनिट पर्यंतचे विद्युत बील कायम स्वरुपी माफ करावे अशी जोरदार मागणी जन आंदोलन विकास कृती समिती महाराष्ट्राचे अध्यक्ष व पीपल्स फोरम फॉर सोशल कॉजचे सचिव शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी केलेली आहे.

खाजगी कंपन्यांना परवान्या मुळे मनमानी वाढेल म्हणून या कंपन्यांना वीज वितरणाचा परवाना मंजूर झाल्यास शासनाच्या महावितरण कंपनीस दुय्यम स्थान प्राप्त होईल आणि खाजगी कंपन्यांची मनमानी वाढुन कालांतराने प्रचंड वीज बीलवाढ होऊन सर्व सामान्य नागरीकांना आर्थिक भुर्दंड वाढणार आहे ही अत्यंत महत्वाची अभ्यासु बाब त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे लक्षात आणुन देत नमुद केले होते की, विद्युत निर्मिती जरी खाजगी कंपन्यांनी केली तरी वितरण व्यवस्था फक्त आणि फक्त महावितरण कंपनी कडेच असावी त्या स्थितीत कोणाची वीज घ्यायची किंवा कुठल्या कंपनीचे वीज मीटर घ्यायचे ही सक्ती वाढेल म्हणुन जनहितार्थ हा होऊ घातलेला निर्णय शासनाने तत्काळ अमान्य करून रद्द करावा अशीही मागणी राज्याच्या मुख्यमंत्र्यां कडे त्यांनी केली असुन

या विषयाचे गांभीर्य त्यांनी लक्षात घेतल्याचे स्पष्ट होत आहे. या बाबत जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांना मुख्यमंत्र्यांचा मेल प्राप्त झाला असल्याची बाब महत्वाची ठरत आहे.

**सध्याची गंभीर माहिती व बाब**

अशी आहे की २३मे २०२२ रोजी केंद्र शासनाने याच अधि सूचनेत सुधारणा केली आणि १७ऑगस्ट २०२१ च्या मूळ अधिसूचनेला मागे घेतले असुन(विथड्रॉन) केल्याचे स्पष्ट होत असुन असुन नव्या २०२२ च्या अधिसूचनेत वेळसीमा समान राहिली,असे स्पष्टीकरण देण्यात आलेले आहे.

जनआंदोलन विकास कृती समिती महाराष्ट्राचे अध्यक्ष आणि शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनीं नमुद केले की, केंद्रीय ऊर्जा मंत्र्यांनी एक स्पष्टीकरण केले होते व त्यात नमुद केले आहे की,ग्राहकां साठी प्रीपेड स्मार्ट मीटर्स अनिवार्य नाहीत असे केंद्रीय ऊर्जा मंत्री मनोहर लाल यांनी स्पष्ट केलेले असुन सर्व ग्राहकांसाठी प्रीपेड इलेक्ट्रिक स्मार्ट मीटर्स अनिवार्य नाहीत. लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासा दरम्यान विचारले ल्या पूरक प्रश्नांना उत्तर देताना सुद्धा ते म्हणाले होते की, जर ग्राहकांनी प्रीपेड स्मार्ट मीटर्सचा पर्याय निवडला,तर त्याचा फायदा केवळ ग्राहकांनाच नाही, तर संबंधित राज्ये आणि वीज वितरण कंपन्यां नाही होईल. त्यांनी सांगितले होते की, अनेक राज्यांमध्ये स्मार्ट प्रीपेड मीटर्स बसवण्यात आले आहेत. मंत्र्यांनी हे देखील स्पष्ट केले की, प्रीपेड इलेक्ट्रिक स्मार्ट मीटर्स कोणत्याही ग्राहकांवर बळजबरीने लादले जात नाहीत, कारण ही एक ऐच्छिक सुविधा आहे पुढे त्यांनी असेही म्हंटले आहे की,ज्या ठिकाणी प्रीपेड प्रणाली लागू करण्यात आली आहे,तिथे कंपन्यांचे नुकसान थांबले असून त्या नफ्यात आल्या आहेत.आता ग्राहकांच्या फायदा व नुकसानी चा विचार अजिबात न करता खाजगी कंपन्या आणि त्यांचे व्यवस्थापन यांच्या आर्थिक फायद्यासाठी स्मार्ट मिटरचा (टी ओ डी)फास सर्वसामान्य नागरिकांच्या आणि ग्राहकांच्या गळ्या भवती आवळल्या जात असुन केंद्रीय मंत्र्यांनी त्या वेळी दिलेल्या माहिती नुसार सध्या वीज वितरण कंपन्यांचे नुकसान जवळपास सात लाख कोटी रुपयां पर्यंत पोहोचले आहे. बिलांची योग्य वसुली सुनिश्चित करण्यासाठी प्रीपेड स्मार्ट मीटर्स आणले जात असल्याचे त्यांनी सांगितले आणि यातच सर्व बाबी स्पष्ट होत असल्याची बाब जन आंदोलन विकास कृती समिती महाराष्ट्राचे अध्यक्ष आणि शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी पुढे आणली आहे.

# 'सहकारी बँकांसाठी डेटा संरक्षणाची नवी दिशा DPDP Act 2023.' DPDP Act 2023 आणि आरबीआय मार्गदर्शक तत्त्वांचा समन्वय

भारतातील बँकिंग क्षेत्र झपाट्याने डिजिटल होत आहे. कोअर बँकिंग, मोबाईल बँकिंग, UPI, Aadhaar Enabled Payment System (आधार सक्षम पेमेंट प्रणाली), DLS (Digital Lending System)

डिजिटल कर्ज वितरण प्रणाली अशा सेवांमुळे ग्राहकांचा डेटा मोठ्या प्रमाणावर निर्माण आणि वापरला जात आहे. या पार्श्वभूमीवर डेटा हा केवळ Operational साधन नसून तो बँकेची मूलभूत संपत्ती (कोअर असेट ) बनला आहे.

परंतु जिथे डेटा आहे, तिथे धोका (रिस्क) देखील आहे. डेटा लीक, सायबर हल्ले, अनधिकृत वापर या गोष्टींमुळे ग्राहकांचा विश्वास ढासळू शकतो. यासाठीच भारत सरकारने " Digital Personal Data Protection Act, 2023 " लागू केला आहे आणि RBI ने बँकांना डेटा सुरक्षा व गोपनीयतेबाबत कठोर मार्गदर्शक तत्त्वे दिली आहेत.

विशेषतः सहकारी बँकांसाठी हा विषय अधिक महत्त्वाचा आहे, कारण त्यांच्या प्रणाली, मनुष्यबळ आणि IT क्षमता तुलनेने मर्यादित असतात.

DPDP Act 2023 : तत्त्वज्ञान आणि उद्दिष्ट : DPDP Act 2023 चा मुख्य उद्देश म्हणजे व्यक्तीच्या वैयक्तिक माहितीचे संरक्षण करताना संस्थांना जबाबदार बनवणे.

या कायद्याचा पाया तीन प्रमुख तत्त्वांवर आधारित आहे:

•Consent-based {rocessing - ग्राहकाची स्पष्ट परवानगी.

•Purpose limitation - ज्या उद्देशासाठी डेटा घेतला, त्याच उद्देशासाठी वापर.

•Data minimisation - आवश्यक तेवढाच डेटा.

प्रमुख संज्ञा (Banking Context मध्ये समजून घेणे)

- Data Princpial – बँकेचा ग्राहक
- Data Fiduciary – बँक जी डेटा वापरते
- Data Processor - CBS> vendor / IT service {rovider
- Consent Manager - consent व्यवस्थापन करणारी प्रणाली.

या संकल्पना बँकिंग ऑपरेशन्समध्ये थेट लागू होतात, विशेषतः KYC, lending आणि digital transactions मध्ये.

ग्राहकांचे अधिकार : बँकांसाठी नवी जबाबदारी

DPDP अर्ली अंतर्गत ग्राहकांना खालील अधिकार दिले आहेत:

- डेटा Access करण्याचा अधिकार
- Correction आणि Updation करण्याचा अधिकार
- SoQm Erase करण्याचा अधिकार
- Grievance redressal करण्याचा अधिकार

याचा अर्थ असा की, बँकांनी आता Customer data lifecycle पूर्णपणे व्यवस्थापित करणे आवश्यक आहे.

Consent Management : बँकिंगमधील सर्वात मोठा बदल

DPDP Act मुळे बँकिंगमध्ये सर्वात मोठा बदल "Consent Management" मध्ये दिसून येतो.

Consent hr:

- Free (स्वेच्छेने दिलेली)
- Specific (ठराविक उद्देशासाठी)
- Informed (पूर्ण माहिती देऊन)
- Unambiguous (स्पष्ट)

अशी असणे आवश्यक आहे.

उदाहरण:

KYC साठी घेतलेला डेटा चरीज्ञशींळपस साठी वापरायचा असेल तर स्वतंत्र उेपीशपीं आवश्यक आहे.

Data Protection Princpiles : बँकांनी काय पाळावे

- Purpose Limitation

ग्राहकाचा डेटा फक्त ठरलेल्या उद्देशासाठी वापरणे

- Storage Limitation

उद्देश पूर्ण झाल्यानंतर डेटा ठेवू नये

- Security Safeguards

Encryption, access control, audit trail यांची अंमलबजावणी

RBI मार्गदर्शक तत्त्वे : सहकारी बँकांसाठी काय अपेक्षित?

Reserve Bank of India ने विविध Circulars द्वारे डेटा सुरक्षा आणि IT Governance बाबत स्पष्ट निर्देश दिले आहेत.

१) IT Governance Framework

- बँकेने IT policy तयार करणे
- Board level oversight ठेवणे
- Information Security Police लागू करणे

२) Cyber Security Framework

- Cyber audit नियमित करणे
- Vulnerability assessment आणि Penetration testing

Incident response mechanism तयार ठेवणे.

3) Data Breach Reporting

RBI नुसार:

सायबर घटना त्वरित रिपोर्ट करणे आवश्यक.

काही प्रकरणात ६ तासात reporting अपेक्षित.

DPDP Act Zwgma Data Protection Board ला breach कळवणे आवश्यक (साधारण ७२ तासाच्या चौकटीत)

यामुळे dual reporting requirement निर्माण होते.

DPDP Act आणि RBI नियमांमधील संघर्ष (Conflicts)

- Retention vs Erasure

RBI डेटा ठराविक काळासाठी ठेवणे आवश्यक

DPDP उद्देश संपल्यावर delete करणे

- Breach Reporting Timeline

RBI त्वरित / काही तासांत

DPDP निश्चित वेळेत (reasonable time)

बँकांनी यासाठी integrated compliance policy तयार करणे अत्यावश्यक आहे.

सहकारी बँकांसाठी आव्हाने:

- IT infrastructure मर्यादित
- Skilled manpower कमी
- Vendor dependency जास्त
- Compliance awareness कमी

त्यामुळे DPDP compliance हे फक्त कायदेशीर नव्हे तर Operational challenge आहे.

Governance Framework : बँकांनी काय करावे?

- Data Protection Officer (DPO) नेमणे

डेटा संरक्षणासाठी जबाबदार अधिकारी

- RoPA (Records of Processing Activities)

डेटा कुठे आणि कसा वापरला जातो याची नोंद

- Board Level Accountability

डेटा संरक्षण हा management चा मुख्य विषय बनवणे

Banking Operations मध्ये DPDP ची अंमलबजावणी

- KYC Process

फक्त आवश्यक माहिती घेणे

consent document करणे

- Loan Processing

डेटा sharing करताना consent घेणे

third-party risk व्यवस्थापित करणे

- Digital Banking

mobile app मध्ये privacy by design

मजबूत authentication प्रणाली

Non-Compliance चे परिणाम

DPDP अर्ली अंतर्गत:

मोठे आर्थिक दंड (crores मध्ये)

Data Protection Board द्वारे चौकशी

**प्रतिष्ठेवर परिणाम-**

सहकारी बँकांसाठी हे विशेषतः गंभीर आहे कारण त्यांचा व्यवसाय विश्वासावर आधारित असतो.

Integrated Compliance Strategy पुढील दिशा :

बँकांनी खालील integrated approach स्वीकारणे आवश्यक आहे :

- IT + Legal + Risk management यांचा समन्वय
- Cyber security आणि data privacy एकत्रित करणे
- नियमित training आणि awareness कार्यक्रम

निष्कर्ष: DPDP Act 2023 मुळे भारतीय बँकिंग क्षेत्रात डेटा संरक्षणाचे नवीन युग सुरू झाले आहे.

सहकारी बँकांसाठी हा केवळ Compliance चा विषय नसून:

- ग्राहकांचा विश्वास टिकवणे
- डिजिटल स्पर्धेत टिकून राहणे

आणि

- सुरक्षित बँकिंग व्यवस्था निर्माण करणे

या सर्वांचा आधार आहे.

Reserve Bank of India च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार आणि Digital Personal Data Protection Act, 2023 च्या अंमलबजावणीद्वारे बँकांनी "Data Protection Culture" विकसित करणे ही काळाची गरज आहे.

शेवटी बँकर्स म्हणून आपण हा विचार नक्कीच केला पाहिजे कि ग्राहकाचा डेटा म्हणजे विश्वास. आणि विश्वासाचे संरक्षण हेच बँकिंगचे खरे तत्त्व आहे.

**- व्यंकटेश कुळकर्णी.**
प्रशिक्षण केंद्र प्रमुख.
सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्था मर्यादित पुणे.

# गौमाता ५६ छप्पन भोग महोत्सव समारंभ



छत्रपती संभाजीनगर, दि. १६ (प्रतिनिधी) – अधिकमास निमित्त रविवार दि. १४ जुन रोजी भाजप राजस्थान प्रकोष्ठ व महिला प्रकोष्ठ तर्फे रंगारगल्ली येथील जोहरीवाडा गौशाला येथे गौमाता छप्पन भोग महोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या महोत्सवा अंतर्गत गौमाता पुजन, गौमाता आरती सोबतच २०० हुन अधिक गायींसाठी घास, सरकी, खल्ली, विविध फळे, लाप्सी, भाजीपाला, ड्रायफ्रूट्सब, पुरणपोळी आदि..एकुण ५६ भोग चे जेवन उपस्थितांच्या हस्ते देण्यात आले. या प्रसंगी छत्रपती संभाजीनगरचे महापौर समीर राजूरकर, राजस्थान प्रकोष्ठ चे मार्गदर्शक सी एस सोनी, सीए. आर बी शर्मा, पंडित ऋषी दायमा, राजू अग्रवाल डॉ. नवल जाजू सोबतच राजस्थान प्रकोष्ठ व महिला प्रकोष्ठ चे सर्व पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रकल्प प्रमुख अरूण मालाणी, रतन अग्रवाल, दीपाली बडजाते, सपना बडजाते समवेत राजस्थान प्रकोष्ठ व महिला सदस्यांनी परिश्रम घेतले. यावेळी सर्व प्रकल्प प्रमुखांना सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी गोशाळेच्या शेड निर्माण कार्यासाठी राजस्थान प्रकोष्ठ परिवारातर्फे आर्थिक सहाय्य देण्यात आले. कार्यक्रम पश्चात उपस्थित सर्व समाजबांधवांसाठी भोजन महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

# श्रीस्वामी समर्थ पालखी पादुका परिक्रमाचे वैजापूरात भव्य-दिव्य स्वागत



वैजापूर, दि. १६ (प्रतिनिधी)- अक्कलकोट निवासी श्री. स्वामी समर्थ महाराज यांच्या पालखी पादुकांची परिक्रमा गेल्या २९वर्षापासून वैजापूरात येत आहे. येथील गुळस्कर परिवार व डरांगे परिवार यांच्या वतीने पूजन, आदरातिथ्य व महाप्रसाद सेवा करण्यात येते. याही वर्षी मंगळवार(ता,१६) रोजी महाराष्ट्र परिक्रमा साठी असलेली पालखी वैजापूरात येताच गूळस्कर परिवार व डरांगे परिवार तसेच वैजापूर व वस्ती गायकवाडवाडी वासीयांच्या वतीने सकाळी साडे अकरा वाजता श्री. स्वामी समर्थ महाराज आरती होऊन महाप्रसाद वाटप करण्यात आले.

आरतीत जेष्ठ नागरिक तथा सेवा निवृत्त शिक्षणांधिकारी धोंडिरामसिंह राजपूत ,अण्णा अधिकार, गणेश अनर्थे, देवा भाटीया, अनिल प्रभाकरराव गुळस्कर, सौ. उमा गूळस्कर, रोहित गुळस्कर सहभागी झाले होते. आरती नंतर सर्व उपस्थित भक्त भाविकांना महाप्रसाद प्रदान करण्यात आला.नगरसेवक विशाल संचेती, सरपंच दौलत गायकवाड यांनीही भेटी देऊन दर्शन घेतले. सुनील व राजू गुळस्कर यांनी सहभाग नोंदविला.

सोमवार रोजी पालखी येथील पवार परिवार यांच्या श्री. स्वामी समर्थ भोजनालय येथे मुक्कामी होते.पालखी सोबत असलेले संजय महाराज कुलकर्णी यांचे पूजन या समयी करण्यात आले.या पालखी परिक्रमाचे आयोजक जन्मजय राजे भोसले असून ही महाराष्ट्र पादुका पालखी परिक्रमा त्यांच्या मार्गदर्शनाखाली अखंडपणे सुरू आहे.

पान २ वरून...

## अखेर १०० टक्के इथेनॉल इंधनाला केंद्राची मंजुरी- नितीन गडकरी

बदल स्वीकारला आहे. त्याच अनुषंगाने अनेक मोठ्या कंपन्या १०० टक्के इथेनॉलवर चालणाऱ गाड्या बाजारात आणण्यासाठी तयार आहेत. टोयोटा, सुझुकी, एमजी आणि धुंदाईसह इतर कंपन्या दीड महिन्यात नवीन गाड्या बाजारात लॉंच करतील, असे गडकरींनी स्पष्ट केले.

**तिजोरीवरचा भार कमी होईल**

१०० टक्के इथेनॉल इंधन हा पेट्रोलच्या तुलनेत खूप स्वस्त पर्याय आहे. हिंदुस्थान आपल्या गरजेचा मोठा भाग परदेशातून कच्चे तेल आयात करून पूर्ण करतो. त्यामुळे सद्यस्थितीत देशाच्या तिजोरीवर मोठा आर्थिक भार पडत आहे. १०० टक्के इथेनॉल इंधनाच्या वापरामुळे सामान्य जनतेला महागड्या पेट्रोलपासून दिलासा मिळण्याबरोबरच देशाचे इंधन आयात बिल कमी होईल आणि पर्यायाने तिजोरीवरील भार कमी होईल, असे गडकरींनी नमूद केले.

# ब्राह्मण महासंघाकडून १७९ गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव; दहा विद्यार्थ्यांना मिळणार शिष्यवृत्ती

## समर्थ राम मंदिरात पार पडला भव्य सत्कार सोहळा; शिष्यवृत्तीसाठी ५७ अर्ज प्राप्त





छत्रपती संभाजीनगर, दि. १६ (प्रतिनिधी) – अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या वतीने दहावी व बारावी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गुणवंत सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. समर्थनगर येथील समर्थ राम मंदिरात रविवारी (दि. १४ जून) आयोजित या कार्यक्रमात ८७ टक्क्यांपासून ९९ टक्क्यांपर्यंत गुण मिळवणाऱ्या एकूण १७९ विद्यार्थ्यांचा पालकांच्या उपस्थितीत सन्मान करण्यात आला. याचबरोबर समाजातील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजनेची घोषणा करण्यात आली असून, एकूण दहा विद्यार्थ्यांना त्याचा लाभ दिला जाणार आहे.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. विश्वेश घाणेकर, ब्राह्मण समाज समन्वय समितीचे अध्यक्ष मिलिंद दामोदरे तसेच विहिंप मंत्री अभिषेक कादी उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आणि करिअर निवडीसंदर्भात मार्गदर्शन केले. या सत्कार सोहळ्यासाठी एकूण २४० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १७९ विद्यार्थी आपल्या पालकांसह प्रत्यक्ष उपस्थित राहिले. उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र आणि पेन देऊन गौरविण्यात आले.

### सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांमुळे महासंघाची वेगळी ओळख

अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाकडून वर्षभर विविध सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक आणि धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. या उपक्रमांना समाजबांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. जिल्हाध्यक्ष सुधीर नाईक आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या पुढाकारातून अनेक लोकोपयोगी कार्यक्रम सातत्याने राबविले जात असून त्यांची समाजात व्यापक चर्चा होत असते. यापूर्वी पत्रकार दिनानिमित्त पत्रकारांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी विशेष सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. समाजातील विविध घटकांना एकत्र घेऊन, सर्वांच्या सहभागातून कार्यक्रमांची आखणी करण्याची सुधीर नाईक यांची कार्यपद्धती असल्याने प्रत्येक उपक्रम यशस्वी ठरत असल्याचे उपस्थित मान्यवरांनी सांगितले. त्यांच्या एका आवाहनावर समाजातील कार्यकर्ते व सदस्य मोठ्या संख्येने एकत्र येऊन कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी योगदान देतात, असे गौरवोद्गारही यावेळी काढण्यात आले.

**शिष्यवृत्तीसाठी ५७ अर्ज; चार विद्यार्थ्यांची नावे जाहीर**

शैक्षणिक मदतीच्या उद्देशाने महासंघाने शिष्यवृत्ती योजना जाहीर केली होती. या योजनेसाठी एकूण ५७ अर्ज प्राप्त झाले. त्यापैकी पात्र ठरलेल्या चार विद्यार्थ्यांची नावे या कार्यक्रमात जाहीर करण्यात आली. उर्वरित सहा पात्र विद्यार्थ्यांची निवड प्रक्रिया पूर्ण करून त्यांनाही लवकरच शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे जिल्हाध्यक्ष सुधीर नाईक यांनी केले. अंजली गोरे यांनी आभार प्रदर्शन केले. प्रमुख अतिथींचे स्वागत सुरेखा पारवेकर, स्मिता नगरकर, मोहन काळे, गायत्री न्यायाधीश, अंजली देशपांडे, छाया खोचे, वैभव कुलकर्णी आणि ॲड. अश्विनी कुलकर्णी यांनी केले.

**शिक्षणाला प्रोत्साहन देणारा उपक्रम**

गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान आणि गरजू विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीची घोषणा या माध्यमातून अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाने शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचा महत्त्वपूर्ण संदेश दिला आहे. विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव करण्याबरोबरच त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी मदतीचा हात देण्याचा महासंघाचा हा उपक्रम समाजात कौतुकाचा विषय ठरत आहे.

# फावल्या वेळात काय करायचं ?

**महाभारतात** एक सुंदर कथा येते ती अशी की, जेव्हा पांडवाना बारा वर्षाचा वनवास होतो. पांडव आणि द्रौपदी अव्दैतवनात राहू लागतात. त्यांची विचारपूस करायला भगवान श्री कृष्ण वनात जातात.

त्यांची विचारपूस करत असताना भगवान भीमाला विचारतात तुम्हाला वनवास झाला आहे आता तु काय करणार भीमा. त्यावर भीम म्हणतो आता आमच्याकडे वेळच वेळ आहे मी खाणार आणि झोपणार, हे ऐकून भगवान कपाळावर हात मारतात आणि पुढे जातात.

भगवान झोपडीत जातात तिथे बसलेल्या द्रौपदीची विचारपूस करून तिला विचारतात ताई, नकुल सहदेव कुठे आहेत? द्रौपदी म्हणते ते पहा झाडाखाली बसलेत. भगवान त्यांच्याकडे जातात आणि त्यांना पाहतात तर हे दोघे सारीपाट खेळत असतात. भगवान त्यांना पाहून म्हणतात हौस फिटली नाही वाटत तुमची, या खेळामुळे तर ही वेळ आली आहे तुमच्या सर्वांवर ते दोघे लाजतात आणि भगवंताला प्रणाम करतात.

भगवान पुढे युधिष्ठिराकडे (धर्मराजा) जातात आणि म्हणतात काय हे धर्मा तुम्ही सर्व वेळ मिळाला म्हणून फक्त आराम करताय हे बरोबर नाही. त्यावर अर्जुन म्हणतो, 'हे कृष्णा, काय करणार आम्हाला आता वेळच वेळ आहे.'

हे या सर्वांचे विचार ऐकून भगवान विचारात पडतात आणि निर्णय घेतात व सर्वांना एकत्र करून म्हणतात चला आपल्याला इंद्राकडे जायचं आहे.

तोच अर्जुन म्हणतो, 'कशाला!'

भगवान म्हणतात तुला मृदंग शिकायचा आहे, धर्माला सल्ला कसा द्यायचा हे शिकायचं आहे, भीमाला स्वयंपाक, सहदेवाला घोडे राखायला, नकुलाला रथ चालवायला आणि द्रौपदीला झाडलोट करणं शिकायचं आहे. हे ऐकताच सर्व आचर्यचकित होऊन भगवंताकडे पाहू लागले.

धर्मराजा म्हणाले – भगवान आम्ही राजे आहोत, हे शिकुन काय फायदा? तुम्ही द्रौपदीचा तरी विचार करा ती भरतवर्षाची स्मरादिनी आहे.

भगवान म्हणतात जास्त विचार करू नका, वेळ आल्यावर कळेल सर्व. आणि हे सर्व इंद्र महालात जाऊन विविध काम शिकतात.

बारा वर्षांचा वनवास संपतो. पण एक वर्षाचा अज्ञातवास राहिला होता. (कौरवांनी बारा वर्षाचा वनवास पांडवाना दिला होताच पण त्याबरोबर असा डाव पण केला होता कि जर वनवासानंतर एक वर्षात जर तुम्ही आम्हाला दिसला तर परत तुम्हाला वनवास आणि अज्ञातवास होईल).

आता सर्वांना कळेना की आपण एक वर्ष लपायच कुठे? त्यांनी भगवंतांना विचारलं. भगवान म्हणतात हिच ती वेळ आहे. तुम्ही रिकाम्या वेळात जी इंद्राकडे जाऊन काम शिकलात ना, आता तुम्हाला त्याचा फायदा होईल. आणि भगवंताने त्यांना विराट राजाचा पत्ता दिला. ते सर्वजण स्वतःची ओळख लपवून विराट राजाकडे सेवकाची काम करतात. यात धर्मराजा कंक नावाचा ब्राह्मण होतो आणि राजाला सल्ला देतो, भीम बल्लव नावाचा आचारी होतो, अर्जुन बृहन्नडा नावाचा मृदंग वादक होतो, सहदेव घोडे राखणारा, नकुल रथ सारथी तर द्रौपदी विराट राजाच्या रानीची दासी होते.

**या प्रमाणे खाली वेळात शिकलेल्या कामाचा त्यांना अशा प्रकारे फायदा होतो.**

तात्पर्य – या कथेवरून हेच कळते की रिकामा वेळ मिळाला की झोपा काढण्यात आणि ऋराशी खेळण्यात वाया घालवायचा नसतो. तर या वेळात आपल्या बुद्धीला चालना मिळेल अशी कामं करावी.

व्यायाम, योग, घरगुती कामे, कोडी सोडवणे, विद्यार्थानी पुढच्या वर्षाचा अभ्यास, मुलामुलींनी दोघांनी वेगवेगळे पदार्थ करायला शिकणे, गावात असाल तर शेतीची कामे अशी खुप काम आहेत आपल्याकडे.

सर्वात महत्त्वाचं काम म्हणजे आपल्या बुद्धीला मनाला चालना मिळण्यासाठी धार्मिक ग्रंथांचे अवलोकन, अध्ययन करणे आवश्यक आहे. कारण आपण चइअ, उअ, अर्वीलरींश, च उे,चए असे उच्चशिक्षित असाल पण या शिक्षणामुळे माणूस विवेकी तर होतो.

मात्र तो विवेक वापरायला अध्यात्म शिकवते

धार्मिक ग्रंथ वाचून कोणाला पद मिळणार नाही. पण मिळालेल्या पदावर अहंकाररहित कसं राहायचं याची चालना मिळेल. कोणाला धन मिळणार नाही. पण जवळ १० रूपये जरी असतील तरी त्यात समाधानी कसं राहायचं याची चालना मिळेल. कोणाला प्रतिष्ठा मिळणार नाही पण दुसऱ्याच्या संपत्तीला पाहून मनात आग लागणार नाही. माणूस जन्माला आल्यापासून आनंदाच्या मागे धावतो आहे पण आनंद तर सोडाच, सुखही त्याला मिळत नाही कारण

संसार दु: खालयमब अशाश्वतम

आंनदस्वरूप फक्त भगवानच आहे तो आनंद (सत-चित-आनंद) श्रीमद्भगवद्गीतेत, श्री ज्ञानेश्वरीत, श्रीमद भागवतात, तुकोबा ज्ञानोबा गाथेत अशा अनेक ग्रंथात आहे. आपल्या संतांनी, ऋषीमुनींनी इतके ग्रंथ लिहुन ठेवलेत कि जर ते ग्रंथ एकमेकावर ठेवले तर भगवंता पर्यंत शिडी तयार होईल. भगवंताला ज्ञानी भक्त खूप आवडतो. हिच वेळ आहे मायबाप, इतके ज्ञानी व्हा कि जसे तुकोबा म्हणतात, तुका सहज बोले जरी वाणी वेदांत वाहे त्याच्याघरी पाणी...

**राज्याच्या विकासात बँकेचे योगदान महत्त्वपूर्ण - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

# स्टँडर्ड चार्टर्ड बँकेच्या सामाजिक उपक्रमांचा महाराष्ट्रातील ८.३ लाखांहून अधिक नागरिकांना लाभ

मुंबई, दि. १६ (प्रतिनिधी)- स्टँडर्ड चार्टर्ड बँकेने गेल्या सात वर्षांत महाराष्ट्रात जलसुरक्षा, आरोग्यसेवा, रोजगारनिर्मिती आणि हवामान बदलाला तोंड देण्याच्या क्षमतेच्या विकासासाठी राबविलेल्या विविध सामाजिक उपक्रमांचा राज्यातील ८.३ लाखांहून अधिक नागरिकांना थेट लाभ झाला आहे. या उपक्रमांमुळे राज्याच्या विकासात मोलाचे योगदान दिले आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्य शासन आणि खासगी क्षेत्र यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे विकासाचे फायदे समाजातील वंचित घटकांपर्यंत पोहोचत आहेत. जलसंवर्धन, ग्रामीण विकास, महिला सक्षमीकरण आणि आरोग्यसेवा या क्षेत्रांत स्टँडर्ड चार्टर्ड बँकेने केलेले कार्य राज्याच्या विकास उद्दिष्टांना पूरक ठरत आहे. बँकेच्या विविध सामाजिक उपक्रमांच्या लाभार्थ्यांमध्ये महिलांचे प्रमाण ५२ टक्क्यांहून अधिक असून, जलसंधारण, आरोग्यसेवा आणि उपजीविका वृद्धी या क्षेत्रांवर विशेष भर देण्यात आला आहे. महाराष्ट्रातील ३० जिल्ह्यांमध्ये; तसेच राज्यातील ७५ टक्के आकांक्षी जिल्ह्यांमध्ये हे उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आले आहेत.

**जलसुरक्षेसाठी व्यापक उपाययोजना**

जलसुरक्षा उपक्रमांतर्गत १.०६ अब्ज लीटर गोड्या पाण्याची साठवण क्षमता निर्माण करण्यात आली असून, दुष्काळग्रस्त भागांमध्ये ४५ वॉटर एटीएमची स्थापना करण्यात आली आहे. मराठवाडा आणि विदर्भातील गावांसह राज्यातील २७१ गावांमध्ये जलसुरक्षा मजबूत करण्यात आली आहे; तसेच ८ हजारांहून अधिक शेतकऱ्यांना जलसंवर्धन उपाययोजना आणि हवामान-सुसंगत शेती तंत्रज्ञानासाठी मदत करण्यात आली आहे. हवामान बदलाचे परिणाम कमी करण्याच्या दिशेने ७ लाख वृक्षांची लागवड हा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला आहे.

**रोजगार आणि कौशल्य विकासाला चालना**

रोजगारक्षमतेच्या क्षेत्रात ६ हजार ५९८ युवकांना कौशल्य विकास आणि रोजगार प्रशिक्षण देण्यात आले असून, त्यापैकी ६३ टक्के युवकांना रोजगार मिळाला आहे. इलेक्ट्रिक वाहने, वाहन उद्योग, कृत्रिम बुद्धिमत्ता, इलेक्ट्रॉनिक्स, बँकिंग आणि उद्योजकता अशा विविध क्षेत्रांत रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. लाभार्थ्यांचे सरासरी वार्षिक उत्पन्न १.६६ लाख रुपये इतके नोंदविण्यात आले आहे. या कार्यक्रमातील ६१ टक्के लाभार्थी महिला असून, ग्रामीण भागातील महिला उद्योजिकांना विशेष आर्थिक सहाय्य पुरविण्यात आले आहे. याशिवाय ७५८ महिला सूक्ष्म उद्योजिकांनाही मदत करण्यात आली आहे.

**आरोग्य क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी**

आरोग्य क्षेत्रात बँकेच्या 'सीईंग इज बिलिव्हिंग' या प्रमुख उपक्रमांतर्गत ४ लाख ३९ हजार ६८८ नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली, तर ३८ हजार ६२५ नेत्रशस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यात आल्या. राज्यभरात ४९ दृष्टी केंद्रांची स्थापना करण्यात आली असून, ही केंद्रे आता स्वयंपूर्ण पद्धतीने कार्यरत आहेत. या केंद्रांमधून दरवर्षी सुमारे १.६ कोटी रुपयांचे उत्पन्न निर्माण होत आहे. जिल्हा अंधत्व नियंत्रण संस्था आणि आयुष्मान भारत यांसारख्या शासकीय योजनांशी समन्वय साधून या उपक्रमांचा विस्तार करण्यात आला आहे. स्टँडर्ड चार्टर्ड बँक, भारतच्या शाश्वतता विभागाच्या प्रमुख करुणा भाटिया यांनी सांगितले की, वंचित आणि दुर्लक्षित समुदायांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणण्यासाठी बँक कटिबद्ध असून, महाराष्ट्रातील जलसुरक्षा, आरोग्य आणि रोजगार क्षेत्रातील उपक्रम ही दीर्घकालीन सामाजिक बांधिलकीची प्रभावी उदाहरणे आहेत.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले की, राज्यातील लाखो नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणणारे हे उपक्रम शाश्वत विकास, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक समावेशनाला गती देणारे ठरत आहेत.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, पूकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# नको अटी-शर्ती, थेट सरसकट कर्जमुक्ती द्या!; ठाकरे गटाचा विभागीय आयुक्त कार्यालयावर मोर्चा!

छत्रपती संभाजीनगर दि.१६ (प्रतिनिधी)- पाऊस लांबल्यामुळे हवालदील झालल्या बळीराजाला आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी आणि राज्यातील सर्व शेतकऱ्यांना कोणत्याही क्लिष्ट अटी-शर्तींशिवाय तातडीने सरसकट कर्जमुक्ती देण्याच्या मुख्य मागणीसाठी आज शहरात राजकीय वातावरण चांगलेच तापले. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने मंगळवारी (१६ जून) सकाळी शहराच्या मुख्य ऐतिहासिक मार्गांवरून एक भव्य आणि आक्रमक 'ट्रॅक्टर रॅली' काढण्यात आली. 'नको अटी-शर्ती, थेट कर्जमुक्ती द्या', 'सर्व शेतकऱ्यांना सरसकट कर्जमुक्ती मिळालीच पाहिजे' आणि 'शिवसेना जिंदाबाद' अशा गगनभेदी घोषणांनी आज संभाजीनगरचा



मध्यवर्ती भाग पूर्णपणे दणाणून गेला होता.

या ऐतिहासिक आंदोलनाची सुरुवात सकाळी ठीक १० वाजता शहरातील मुख्य क्रांती चौक येथून झाली. आंदोलनाचे मुख्य आकर्षण म्हणजे विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी स्वतः डोक्याला भगवा फेटा बांधून ट्रॅक्टरचे स्टिअरिंग हाती घेतले आणि ते रॅलीच्या अग्रभागी सारथी बनले. त्यांच्या पाठीपाठ सुशोभित केलेले सुमारे आठ ते दहा अवाढव्य ट्रॅक्टर या रॅलीत धावत होते. पक्षाचे प्रमुख नेते, पदाधिकारी आणि शेकडो उत्साही कार्यकर्ते या ट्रॅक्टरवर आणि टिल्लरवर स्वार होऊन हातात भगवे झेंडे फडकवत आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

ही भव्य ट्रॅक्टर रॅली क्रांती चौक येथून निघून पैठणगेट, ऐतिहासिक बाराभाई ताजीया, औरंगपुरा बाजारपेठ, मिल कॉर्नर, जुबली पार्क, आमखास मैदान आणि अण्णाभाऊ साठे चौक मार्गे सिडको कडे जाणाऱ्या मुख्य विभागीय आयुक्त कार्यालयावर (अ्न्नेग्दर्हेत ण्दस्स्ेग्दही ध्मि) धडकली. रॅली आयुक्त कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ पोहोचताच, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून पोलिसांनी आधीच कडेकोट बंदोबस्त ठेवत जड लोखंडी बॅरिकेड्स लावून रॅलीला तिथेच रोखले. पोलिसांच्या या अडवणुकीनंतर आंदोलकांनी रस्त्यावरच जोरदार घोषणाबाजी केली.

## आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त रविवारी बिबी का मकबरा व विभागीय क्रीडा संकूलात सामुहिक योगासने




छत्रपती संभाजीनगर दि.१६ (प्रतिनिधी)- आंतरराष्ट्रीय योग दिन रविवार दि.२१ रोजी आहे. यानिमित्त जिल्हा प्रशासनामार्फत सामुहिक योगासने करण्यात येणार आहेत. बिबी का मकबरा व विभागीय क्रीडा संकूलात मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. याशिवाय विविध संस्थांनीही कार्यक्रमाचे आयोजन करावे,असेही आवाहन करण्यात आले आहे.

यासंदर्भात आज जिल्हाधिकारी कार्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनू पी. एम., निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, जिल्हा क्रीडा अधिकारी बाजीराव देसाई, शिक्षणाधिकारी (माध्य.) आश्विनी लाठकर, केंद्रीय पुरातत्व विभागाच्या अधीक्षक डॉ. शिल्पा जमगाडे, जिल्हा युवा अधिकारी मेघा सनवाल तसेच विविध योग संस्थांचे पदाधिकारी, सदस्य आदी उपस्थित होते.

बैठकीत माहिती देण्यात आली की, 'निरोगी वृद्धत्वासाठी योग', ही यंदाच्या योगदिनाची संकल्पना आहे. रविवार दि.२१ रोजी सकाळी साडेसहा ते साडेसात या वेळात योगा प्रात्यक्षिके केली जातील. बिबी का मकबरा व विभागीय क्रीडा संकूल या दोन ठिकाणी या मुख्य कार्यक्रम होईल. त्यात किमान एक हजार व्यक्ति सहभागी होतील,असे नियोजन करण्यात आले आहे. या शिवाय विविध संस्थांनीही आपल्या स्तरावर योग प्रात्यक्षिकांचे कार्यक्रम आयोजित करावा,असे आवाहन करण्यात आले. बिबी का मकबरा येथे भारतीय योग संस्थान व जिल्हा योगासन स्पोर्ट्स असो. या संस्था सहभागी होतील. तर विभागीय क्रीडा संकूल येथे द आर्ट ऑफ लिव्हिंग, पतंजली योग संस्था या संस्था सहभागी होतील. या शिवाय सर्व शासकीय अधिकारी- कर्मचारी, विद्यार्थी, क्रीडा संघटनांचे पदाधिकारी, सदस्य, शाळा, महाविद्यालयाचे विद्यार्थी, राष्ट्रीय छात्रसेना, राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी आदी मोठ्या संख्येने या कार्यक्रमात सहभागी होतील.

## स्मार्ट मीटर जनजागृतीसाठी महावितरणचे मेळावे

छत्रपती संभाजीनगर दि.१६ (प्रतिनिधी)- महावितरणकडून स्मार्ट मीटरबाबत ग्राहकांच्या शंका दूर करण्यासाठी व वस्तुनिष्ठ माहिती देण्यासाठी उपविभागनिहाय ग्राहक समाधान मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यांमध्ये ग्राहकांना स्मार्ट मीटरची कार्यपद्धती, त्याचे फायदे तसेच वीज वापराचे व्यवस्थापन अधिक प्रभावीपणे कसे करता येते याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले जाणार आहे.

१६ जून रोजी छत्रपती संभाजीनगर ग्रामीण उपविभाग-२, बिडकीन, नर्सापूर, गंगापूर, वेरूळ, फुलंब्री, वैजापूर, दहेगाव, शिऊर या गावात स्मार्ट मीटर संदर्भात ग्राहक समाधान मेळावे घेण्यात आले. तसेच खुलताबाद, सावंगी, चौका, सिद्धनाथ वाडगाव, वडोदबाजार, हतनूर, महालगाव, गारज , पिशोर, भवन, शिवना, अजिंठा, आमठाणा या गावांसह सिल्लोड शहरातील बालाजीनगरात बुधवारी (१७ जून) स्मार्ट मीटर संदर्भात ग्राहक समाधान मेळावे घेण्यात येणार आहेत. गुरुवारी (१८ जून) स्मार्ट मीटर संदर्भात पैठण, कानडगाव. गदाना, परसोडा, खंडाळा, नागापूर येथे तर शुक्रवारी (१९ जून) गोळेगाव, डोंगरगाव, कासोद येथे ग्राहक समाधान मेळावे घेण्यात येणार आहेत.

छत्रपती संभाजीनगर शहरातील गृहनिर्माण सोसायट्यांत जाऊन महावितरणतर्फे स्मार्ट मीटरबाबत प्रबोधन करण्यात येणार आहे.

स्मार्ट मीटरमुळे ग्राहकांना त्यांच्या वीज वापराची माहिती रिअल-टाइममध्ये उपलब्ध होते. त्यामुळे वीज वापर नियंत्रित करणे, अनावश्यक खर्च टाळणे आणि ऊर्जाबचत करणे अधिक सुलभ होते. स्मार्ट मीटर रीडिंगसाठी मानवी हस्तक्षेप नसल्याने बिलिंग प्रक्रिया अधिक अचूक व पारदर्शक बनते. तसेच मीटरच्या माध्यमातून वीज वापर, बिलाची स्थिती, देय तारीख आणि इतर महत्त्वाच्या सूचना मोबाईल द्वारे तत्काळ मिळू शकतात. मीटरमध्ये बिघाड झाल्यास त्याची माहिती त्वरित उपलब्ध होत असल्याने वीज वितरण व्यवस्थेची कार्यक्षमता वाढण्यास मदत होते.

ग्राहक समाधान मेळाव्यांमध्ये उपस्थित अधिकारी व तंत्रज्ञ नागरिकांच्या सर्व शंकांचे निरसन करणार असून स्मार्ट मीटरविषयी पसरलेल्या गैरसमजांबाबतही वस्तुनिष्ठ माहिती दिली जाणार आहे. या उपक्रमामुळे ग्राहक आणि महावितरण यांच्यातील संवाद अधिक मजबूत होऊन डिजिटल व पारदर्शक वीज सेवेचा लाभ मिळेल, असा विश्वास महावितरणने व्यक्त केला आहे. महावितरणचे सर्व ग्राहकांनी संबंधित उपविभाग स्तरावर आयोजित करण्यात येणाऱ्या ग्राहक समाधान मेळाव्यांना उपस्थित राहून स्मार्ट मीटरबाबत प्रत्यक्ष माहिती घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## गुलमंडी चौकातील डीपी स्थलांतरासाठी हालचाली; स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांची प्रत्यक्ष पाहणी

छत्रपती संभाजीनगर दि.१६ (प्रतिनिधी)- शहरातील गजबजलेल्या गुलमंडी चौकात वाहतुकीस अडथळा ठरत असलेल्या विद्युत पुरवठा केंद्र (डीपी) संदर्भात आज स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांनी प्रत्यक्ष पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला.

गेल्या अनेक वर्षांपासून चौकाच्या मध्यभागी असलेली ही डीपी वाहतूक कोंडी तसेच नागरिकांच्या दैनंदिन हालचालींसाठी अडचणीची ठरत आहे. विशेषतः पादचारी आणि वाहनचालकांना यामुळे मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत असल्याच्या तक्रारी वारंवार समोर येत होत्या.

पाहणीदरम्यान रस्त्यात अडथळा निर्माण करणारे विद्युत खांब तातडीने हटविण्यासह परिसरातील सर्व विद्युत केबल भूमिगत करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या. यामुळे वाहतुकीचा मार्ग अधिक मोकळा होण्यासोबतच परिसराचे सौंदर्यीकरण आणि सुरक्षितता वाढण्यास मदत होणार आहे.

या पार्श्वभूमीवर मकरिये यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून डीपीचे तातडीने स्थलांतर करण्यासाठी आवश्यक कार्यवाही सुरू करण्याच्या सूचनाही दिल्या. डीपी स्थलांतरित झाल्यानंतर वाहतुकीचा प्रवाह सुरळीत होण्यास, कोंडी कमी होण्यास आणि पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेत वाढ होण्यास मदत होणार असल्याचे त्यांनी सांगितले. शहरातील नागरिकांच्या दैनंदिन अडचणी दूर करण्यासह मूलभूत सुविधा अधिक सक्षम आणि सुकर करण्यासाठी महापालिका प्रशासन सातत्याने प्रयत्नशील असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

## मराठवाड्यात पावसाची संमिश्र स्थिती; छत्रपती संभाजीनगर आणि जालन्यात पावसाची ओढ

### धाराशिवमध्ये सर्वाधिक ११२ टक्के पाऊस, पेरणीयोग्य पावसाशिवाय पेरणीची घाई न करण्याचा विद्यापीठाचा सल्ला

लातूर दि.१६ (प्रतिनिधी)- यंदाच्या पावसाळ्याच्या सुरुवातीलाच मराठवाडा विभागात अतिशय संमिश्र चित्र पाहायला मिळत आहे. संपूर्ण छत्रपती संभाजीनगर विभागात जून महिन्यासाठी सरासरी ७१.५ मिमी पाऊस अपेक्षित असतो, मात्र प्रत्यक्षात केवळ ४०.७ मिमी (५६.९ टक्के) पावसाची नोंद झाली आहे. संपूर्ण पावसाळी हंगामाच्या (जून ते सप्टेंबर) ६७९.५ मिमी सरासरीचा विचार करता, आतापर्यंत केवळ सहा टक्के पाऊस पडला आहे.

धाराशिव जिल्ह्याला पावसाचा सर्वाधिक दिलासा मिळाला आहे. धाराशिवमध्ये सरासरी ६७.७ मिमी पैकी ७६.३ मिमी (११२.७ टक्के) पाऊस बरसला आहे. बीड जिल्ह्यातही पावसाने चांगली हजेरी लावली. तिथे ६८.५ मिमी सरासरीच्या तुलनेत ५३.४ मिमी (७८ टक्के) पावसाची नोंद झाली. उर्वरित जिल्ह्यांमध्ये मात्र पाऊस मध्यम स्वरूपाचा आहे.

लातूर जिल्ह्यात ४४.९ मिमी (६२.२ टक्के), नांदेडमध्ये ४९.० मिमी (५९.१ टक्के), हिंगोलीत ४३.८ मिमी (४८.६ टक्के) आणि परभणीत ३६.३ मिमी (४६.८ टक्के) पाऊस झाला आहे. छत्रपती संभाजीनगर आणि जालना या दोन जिल्ह्यांत पावसाने मोठी दडी मारली आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये सर्वात कमी म्हणजे अवघा १३.२ मिमी (१९.८ टक्के) आणि जालना जिल्ह्यात १९.२ मिमी (२७.२ टक्के) पाऊस झाला आहे.

प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबईच्या अंदाजानुसार, पुढील पाच दिवसांत मराठवाड्यात तुरळक ठिकाणी वादळी वाऱ्यासह हलक्या पावसाची शक्यता आहे. १६ आणि १७ जून रोजी छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड आणि नांदेड जिल्ह्यात सायंकाळी वादळी वाऱ्यासह हलका पाऊस होऊ शकतो. १८ व १९ जून रोजी छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड जिल्ह्यात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट राहण्याची शक्यता असून, पुढील ३ ते ४ दिवसांत कमाल तापमान २ अंश सेल्सिअसने वाढेल. मात्र, विस्तारित अंदाजानुसार १९ ते २५ जून दरम्यान मराठवाड्यात सरासरीपेक्षा जास्त पाऊस होण्याची शक्यता आहे.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणीच्या तज्ज्ञ समितीने सध्याचा पाऊस हा पूर्व-मौसमी असल्याने शेतकऱ्यांना ७५ ते १०० मिमी पेरणीयोग्य पाऊस झाल्याशिवाय पेरणीची घाई न करण्याचा सल्ला दिला आहे. कपाशीसाठी कोरडवाहू वा बागायती प्रकारानुसार वाण निवडावेत. कापूस पिकात तूर, सोयाबीन किंवा मूग, उडीद आंतरपीक पद्धती वापरावी. मर व करपा रोगाच्या नियंत्रणासाठी बियाण्यास सुडोमोनास फ्ल्युरोसन्स (१० ग्रॅम) किंवा कार्बेंडेझीम (३ ग्रॅम) प्रति किलो याप्रमाणे बीजप्रक्रिया करावी. तुरीसाठी रायझोबियम, स्फुरद विरघळविणारे जिवाणू आणि ट्रायकोडर्माची बीजप्रक्रिया करावी. भुईमुगासाठी एसबी-११, जेएल-२४, एलजीएन-२ या वाणांचा वापर करून थायरमची बीजप्रक्रिया करावी. मक्याची अमेरिकन लष्करी अळीपासून संरक्षणासाठी सायअॅन्ट्रानिलिप्रोल ३ थायामिथॉक्झाम (६ मिली प्रति किलो) बीजप्रक्रिया आवर्जून करून पीक व्यवस्थापन करावे.

तर केळी बागेत घड वाढीसाठी ००:५२:३४ (१५ ग्रॅम प्रति लिटर) फवारणी करावी. आंबा बागेत ढगाळ वातावरणामुळे पर्णगूच्छ रोग टाळण्यासाठी रोगनाशकाची फवारणी करावी. नवीन फळबाग लागवडीसाठी (केळी, आंबा, सीताफळ) रोपे केवळ शासकीय नोंदणीकृत रोपटिकेतूनच खरेदी करावीत. वादळी वाऱ्याचा अंदाज लक्षात घेऊन लहान वेलवर्गीय झाडांना काठीने आधार देऊन फळबाग, भाजीपालांचे व्यवस्थापन करावे. तसेच पशुधन व्यवस्थापन करताना अचानक झालेल्या वातावरणीय बदलामुळे जनावरांचा गोठा कोरडा व हवा खेळती राहील याची काळजी घ्यावी. दुभत्या जनावरांची कास पोटॅशियम परमॅग्नेटच्या पाण्याने धुवावी. पावसाळ्यात जनावरे उघड्यावर किंवा झाडाखाली बांधू नयेत, तसेच कोवळा व हिरवा चारा जास्त प्रमाणात देणे टाळावे, असाही कृषी विद्यापीठाने सल्ला दिला आहे.

## महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळातर्फे खरेदीदार विक्रेता संमेलनास उत्स्फूर्त प्रतिसाद

छत्रपती संभाजीनगर दि.१६ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळातर्फे छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आलेल्या पाचव्या रिव्हर्स बायर-सेलर मीट ला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला, अशी माहिती महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विकास पानसरे यांनी पत्रकारांना दिली.

दि.१६ व १७ असे दोन दिवस आयोजित या आंतरराष्ट्रीय व्यावसायिक मेळाव्यात ओमान, अमेरिका, इंडोनेशिया, श्रीलंका, यूएई, फ्रान्स, केनिया, युगांडा, ब्राझील, कतार, अझरबैजान, इथिओपिया, कॅमेरून आणि झिम्बाब्वे यांसह १५ देशांतील २७ विदेशी खरेदीदार सहभागी झाले होते.

महाराष्ट्रातील १७० हून अधिक अभियांत्रिकी क्षेत्रातील शएई उद्योगांनी या उपक्रमात सहभाग घेतला. दोन दिवसांत



शेकडो बैठका पार पडल्या असून अनेक उद्योगांनी विदेशी खरेदीदारांसोबत व्यावसायिक भागीदारी आणि सामंजस्य करारांच्या दिशेने पावले उचलली. या उपक्रमातून १५० कोटी रुपयांहून अधिक व्यापारक्षमतेची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे, असे पानसरे यांनी सांगितले.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश महाराष्ट्रातील अभियांत्रिकी शएई उद्योगांची निर्यातक्षमता वाढविणे, जागतिक बाजारपेठांमध्ये प्रवेश सुलभ करणे आणि आंतरराष्ट्रीय व्यावसायिक संधी उपलब्ध करून देणे हा आहे. पुढील रिव्हर्स बायर-सेलर मीट २ ते ३ जुलै रोजी नागपूर येथे FIEO च्या सहकार्याने आयोजित करण्यात येणार असून, त्यानंतर कोल्हापूर आणि पुणे येथेही अशा बैठका होणार आहेत, असे त्यांनी सांगितले.

तसेच महाराष्ट्र एमएसएमई समिट व पुरस्कार २०२६' हा राज्यस्तरीय उपक्रम २७ जून रोजी सिडको एक्झिबिशन सेंटर, वाशी (नवी मुंबई) येथे आयोजित करण्यात आला आहे.'महाराष्ट्र शएई पुरस्कार २०२६' साठी नामांकन सादर करण्याची अंतिम तारीख २० जून आहे. राज्यभरातील सुमारे २,५०० हून अधिक शएई उद्योजक, तज्ज्ञ, धोरणकर्ते आणि आंतरराष्ट्रीय प्रतिनिधी या समिटमध्ये सहभागी होण्याची अपेक्षा आहे. कार्यक्रमास मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, उद्योगमंत्री तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहण्याची शक्यता आहे. पुरस्कार नामांकन आणि समिट नोंदणीसाठी संबंधित संकेतस्थळावर अर्ज करता येणार असून अधिक माहितीसाठी ७७१०००९४४ आणि ७७१००००९५४ या क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## चीन भूकंपाने हादरला; एकाचा मृत्यू, इमरजेंसी अलर्ट जारी

किंघाई दि.१६ (वृत्तसंस्था)- चीनच्या नॉर्थ वेस्ट भागातील किंघाई प्रांतात ४० मिनिटांच्या कालावधीत आठ भूकंपांचे धक्के जाणवले. सर्वात शक्तिशाली भूकंपाची तीव्रता ६.३ रिश्टर स्केलची होती. भूकंपाचे केंद्र जमिनीखाली १० किलोमीटर खोल असल्याचे सांगण्यात आले. प्रशासनाने प्रभावित भागात तात्काळ आणीबाणीचा इशारा जारी केला. मदत आणि बचाव कार्यासाठी आपत्कालीन पथके तैनात करण्यात आली असं स्थानिक माध्यमांनी सांगितले.

चीनी वृत्तपत्र ग्लोबल टाइम्सच्या वृत्तानुसार, मंगळवारी स्थानिक वेळेनुसार सायंकाळी ६:४० वाजता किंघाई प्रांतात भूकंपाचा पहिला धक्का जाणवला. या भूकंपाचे केंद्र प्रांतीय राजधानी शियांगपासून सुमारे ५६७ किलोमीटर अंतरावर होते. या भूकंपामुळे एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची माहिती आहे तर ४ जण



जखमी आहेत. सरकारने रेस्क्यू मोहीम हाती घेतली आहे. घटनेचे गांभीर्य पाहता कोळसा खाणींमधून लोकांना बाहेर काढण्यात आले आहे. जीवित आणि मालमत्तेच्या नुकसानीबद्दल सरकार अधिक माहिती गोळा करत आहे. मदत आणि बचाव कार्यासाठी घटनास्थळी दोन विशेष वाहने आणि १० जवान पाठवण्यात आले आहेत. जीवितहानीच्या संख्येचा आढावा घेतल्यानंतर स्थानिक प्रशासन पुढील निर्णय घेईल असं सांगण्यात येत आहे.

(पान १ वरुन)

## जूनच्या पंधरवड्यात देशात सरासरीच्या...

स्थिती विकसित झाल्याची घोषणा भारतीय हवामान शास्त्र विभागाने केली आहे. त्यामुळे यंदाच्या मान्सूनच्या हंगामांवर 'एल निनो' स्थितीचे सावट असणार आहे.

राज्यातही सरासरीहून कमी पावसाची नोंद झाली आहे. कोकण प्रदेशात जूनच्या पंधरवड्यात सरासरी पावसाचे प्रमाण २७.४ मिमी इतके असते. मात्र, आतापर्यंत केवळ ०.५ मिमी पावसाची नोंद झाली आहे. म्हणजे या प्रदेशात सरासरीहून ९८ टक्के कमी पाऊस पडला आहे. तसेच मध्य महाराष्ट्रात सरासरीहून ९८ टक्के कमी पावसाची नोंद झाली आहे, तर मराठवाड्यात हेच प्रमाण ९४ टक्के आहे. याचबरोबर विदर्भात सरासरी पावसाच्या ७७ टक्के कमी पावसाची नोंद झाली.

## पवनराजे निंबाळकर खटल्यात तारीख..

खटल्याची सुनावणी सुरू आहे, आरोपी असणारी लोकं डिले टॅक्टिस करत आहेत, असा आरोप ओमराजे निंबाळकरांनी केला आहे. माझा राजकारणातील जन्म त्यामुळेच आहे, कशामुळे राजेसाहेबांना संपवलं? तर याचं कारण पॉलिटिकल आहे. सन २००४ च्या निवडणुकीत माझ्या वडिलांचा पराभव फक्त ४८४ मतांनी झाला होता, पद्मसिंह पाटील यांना पाठिंबा दिला अशा आशयाचे खोटे पत्र वर्तमानपत्रातात छापलं होतं. आपल्याला राजकीय विरोधक नको, या भावनेतून पवनराजे साहेब आणि त्यांच्या चालकाची हत्या करण्यात आली होती. शांत डोक्याने केलेली ही पूर्वनियोजित हत्या आहे, असेही ओमराजे यांनी म्हटलं.

## आश्वासन नको, विनाअट सरसकट...

बुलडाणा जिल्ह्यापुरता मर्यादित न राहता राज्यव्यापी स्वरूप धारण करण्याची चिन्हे दिसत आहेत. गेल्या काही वर्षांपासून वाढते उत्पादन खर्च, शेतीमालाला मिळत नसलेला हमीभाव, नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस आणि कर्जाचा वाढता बोजा यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. अशा परिस्थितीत सरकारकडून मोठ्या अपेक्षा होत्या. मात्र जाहीर झालेल्या कर्जमाफीमुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांना अपेक्षित दिलासा मिळालेला नसल्याचा दावा आंदोलनकर्त्यांकडून केला जात आहे.

## तामिळनाडूतील शेतकऱ्यांचे...

अशा शेतकऱ्यांचे ३५,००० रुपये माफ केले जातील, असेही सरकारने स्पष्ट केले आहे.

विशेष म्हणजे, तमिळनाडू सरकारने गेल्या महिन्यातच अल्पभूधारक आणि सीमांत शेतकऱ्यांसाठी ५०,००० रुपयांपर्यंतची कर्जमाफी जाहीर केली होती. मात्र, या मर्यादेत वाढ करण्यात यावी, अशी मागणी शेतकरी संघटना आणि प्रतिनिधींनी मुख्यमंत्र्यांकडे केली होती. शेतकऱ्यांच्या या मागणीची दखल घेत मुख्यमंत्री विजय यांनी जुन्या निर्णयात सुधारणा करत कर्जमाफीची मर्यादा थेट ७५,००० रुपयांपर्यंत वाढवली आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार आणि मॉडेल ऑपरेटिंग प्रोसिजरनुसार, सरकारी कर्जमाफी योजनेची संपूर्ण रक्कम ४५ ते ६० दिवसांच्या आत बँकांमध्ये जमा करणे आवश्यक आहे. तमिळनाडू सरकार या नियमांचे पालन करून अत्यंत वेगाने ही प्रक्रिया पूर्ण करणार आहे.

**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका,**
**(उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग)**
महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ अन्वये

जा.क्र.मनपा/वृ.प्रा./२०२६/२२३ दिनांक:- १२.०६.२०२६

**जाहिर प्रगटन**

या जाहिर प्रगटनाद्वारे छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दितील सर्व नागरिकांना कळविण्यात येते कि, वृक्षप्राधिकरण विभागाकडे वृक्ष तोडणेकरिता वरील नमुद अधिनियमातील कलम ८ (२) अन्वये खालील अर्ज प्राप्त झालेले आहेत. ज्याअर्थी वृक्षप्राधिकरणाकडे प्राप्त झालेल्या अर्जाबाबत अधिनियमातील कलम ८ (३) अन्वये स्थानिक वृत्तपत्रात जाहीरात देवुन आक्षेप मागविण्याचे सुचित केलेले आहे. त्याअनुषंगाने अधिनिमयातील अटी व शर्तीस अधिन राहुन प्राप्त अर्जानुसार पाहणी करुन प्रस्ताव तयार कलेले आहेत. सदरचे प्रस्ताव उद्यान व वृक्षप्राधिकरण विभाग, सिध्दार्थ उद्यान मध्यवर्ती बसस्थानक जवळ येथे उपलब्ध असुन प्रस्तुत प्रकरणी आक्षेप तथा सुचना असल्यास लेखी स्वरुपात जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासुन सात (०७) दिवसांच्या मुदतीत द्याव्यात. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही.

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व ठिकाण | वृक्ष तोडण्याचे कारण | वृक्षाच्या प्रजाती व संख्या |
|---|---|---|---|
| १ | अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर. | नमुद वृक्ष प्रस्तावित नविन सर्जिकल इमारत उभारणीच्या बांधकामास बाधित होत असल्याने तोडणेस. | विविध प्रजातीचे- ८२ वृक्ष |
| २ | श्री. सुनिल बाबुराव धुळे, प्लॉट नं.०५, सीटीएस नं.१७५५९, देवगिरी कॉलनी, समतानगर | नमुद वृक्ष प्रस्तावित इमारत बांधकामात बाधित होत असल्याने तोडणेस. | नारळ-०६, आंबा-०१ वृक्ष तोडणेस. |
| ३ | श्री. प्रभु काशिनाथ चावरे, कल्पतरु, प्लॉट नं.१३, नावंदर हॉस्पीटलच्या बाजुला, विद्या निकेतन कॉलनी, जालनारोड | नमुद वृक्ष घरास धोकादायक असुन शेजारी हॉस्पीटल असल्याने वृक्षांचे फळे, फंटे पडुन अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. करिता धोकादायक वृक्ष तोडणेस. | नारळ-०१ |
| ४ | श्री. अब्दुल खालील अब्दुल हाफीज, घर नं.१-१६-५१ (नविन १-२४-९९) सय्यद हॉल बाजुला, लोटाकारंजा | नमुद वृक्ष अर्जदार यांच्या घरात असून पुर्णपणे भिंतीवर टेकलेले आहे. वृक्ष खूप जुने असुन वृक्षाचा विस्तार व उंची मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. सद्यास्थितीत वृक्ष धोकादायक स्थितीत असुन पावसाळ्यात वादळी वा-यामुळे वृक्ष पडून जीवित वा वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही करिता धोकादायक वृक्ष तोडणेस. | कडुलिंब-०१ |
| ५ | श्री.मंगेश पंडितराव आस्वार, नगरभुमापण क्र.१५१८४/२ व १५१८२/अ/२, आकाशवाणीच्या मागे, मित्रनगररोड, | नमुद वृक्ष बांधकामात बाधित होत असल्याने तोडणेस. | सुबाभुळ-०१ |

**स्वाक्षरीत/ -**
**(विजय पाटील)**
**वृक्ष अधिकारी**
**महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर**